नेमणे आहे

नामवंत दै. 'जनता आवाज' वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक ११२ | शुक्रवार, दि. १३ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये



साई समर्थ सिमेंट प्रॉडक्टस्

पाईप कंपनी ६ इंच ते ६ फुटापर्यंत सिमेंट पाईप (As Per ISI) योग्य दरात उपलब्ध.



सिमेंट पाईप | सेफ्टिक टँक | वॉटर टँक | गव्हाणी,ढापे | सिमेंट पोल

सतिष उत्तमराव खर्डे पा. 9552749534
अमोल सितारान थोरात पा. 9764626533
ज्ञानेश्वर रघुनाथ खर्डे पा. मा.उपसरपंच,को.बु।।

राजुरी रोड,श्री स्वामी समर्थ केंद्राच्या पुढे,कोल्हार बु।। 9765481334


## संमिश्र

### संपूर्ण महाराष्ट्रात हायअलर्ट जारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हापूर** : राज्यात अनेक भागांमध्ये मुसळधार पाऊस पडत आहे. आज कोल्हापूर शहरासोबत ग्रामीण भागात ढगफुटी सारखा पाऊस झाला. जोरदार वारा आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस होत असल्याचे समजते. तसेच वीज पडण्याची शक्यता असल्याने प्रशासनाने नागरिकांना सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले आहे. तळकोकणासह दक्षिण म हाराष्ट्रात तसेच विदर्भातही जोरदार पाऊस सुरू आहे. दरम्यान, पुढील दोन दिवस पावसाचे अलर्ट हवामान विभागाने जारी केले आहे.

### सर्व महागड्या तपासण्याचे शुल्क निम्मे : ना. शिरसाट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संभाजीनगर** : छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील जिल्हा नियोजन समि तीची बैठक पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात सर्वात महत्त्वाचा निर्णय घाटी मेडिकल महाविद्यालय किंवा कॅन्सर रुग्णालयामध्ये येणाऱ्या रुग्णांना सीटीस्कॅन किंवा एमआरआयसाठी लागणाऱ्या शुल्कात ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

### पोलिसाच्या मुलीने केली आत्महत्या

**जनता आवाज वृत्तसेवा**

**धाराशिव** : धाराशिवच्या तुळजापुरात छेडछाडीला कंटाळून पोलिस कॉन्स्टेबलच्या मुलीने केली गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. तुळजापूर शहरातील पोलिस कॉर्टर एस.टी. कॉलनीत राहत्या घरी तरुणीने हे टोकाचे पाऊल उचलले आहे. सारिका असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे.

### देशात कोरोनाचे ७१५४ सक्रिय रुग्ण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नवी दिल्ली** : देशात कोरोना विषाणूचा नवीन प्रकार वेगाने पसरत आहे. ३० राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांम ध्ये सक्रिय रुग्णांची संख्या ७१५४ वर पोहोचली आहे. एका आठवड्यापासून दररोज सरासरी ४०० नवीन रुग्णांची नोंद होत आहे. तथापि, बुधवारी फक्त ३३ रुग्णांची नोंद झाली. केरळमध्ये सर्वाधिक २१६५ रुग्ण आहेत. गेल्या एका आठवड्यात कोरोनामुळे ३० जणांचा मृत्यू झाला आहे.




# सरकार योग्यवेळी शेतकरी कर्जमाफी देईल

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची स्पष्टोक्ती; बच्चू कडू यांच्याशी नियमित चर्चा सुरु असल्याचा केला दावा

जनता आवाज वृत्तसेवा

**अकोला : शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन करणाऱ्या प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांच्याशी चर्चा करण्याची तयारी दर्शवली. तसेच सरकार शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा निर्णय योग्यवेळी घेणार असल्याचेही स्पष्ट केले. कोणताही प्रश्न चर्चेने सुटतो. त्यामुळे सरकार बच्चू कडू यांच्याशी चर्चा करण्यास तयार आहे. सरकार व प्रशासन यासंबंधी नियमितपणे त्यांच्या संपर्कात आहे, असे राज्याचे अर्थमंत्री अजित पवार म्हणाले.**



बच्चू कडू यांनी शेतकरी कर्जमाफीसह विविध म ागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या आंदोलनाचा आज पाचवा दिवस आहे. या आंदोलनामुळे सरकार शेतकरी कर्जमाफी केव्हा देणार? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी यासंबंधीचा निर्णय योग्यवेळी घेण्याचे सूतोवाच केले आहे. अजित पवार यांनी यावेळी शेतकऱ्यांची आर्थिक लूट करणाऱ्या कंपन्या व दुकानदारांवर कठोर कारवाई करण्याचेही संकेत दिले असून या प्रकरणी दुकानदारांचे परवाने रद्द केले जातील.

### दुकानदार व कंपन्यांना सोडणार नाही

सरकार खते व बी बियाण्यांचे लिंकिंग करणाऱ्या दुकानदार व कंपन्यांना सोडणार नाही. त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल. या प्रकरणी दुकानदारांचे परवाने रद्द केले जातील. तर कंपन्यांवरही योग्य ती कारवाई केली जाईल. सरकार शेतकऱ्यांना योग्यवेळी कर्जमाफी देऊन त्यांना दिलासा देईल. एवढेच नाही तर लाडक्या बहिणींनाही दरमहा १५०० रुपये देण्यास सरकार तत्पर आहे, असे ते म्हणाले.

### राज ठाकरे - फडणवीस भेटीवर भाष्य


अजित पवार यांनीही यावेळी मनसे अध्यक्ष राज ठाकरे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीवरही भाष्य केले. राज्यातील विविध पक्षांचे नेते मुख्यमंत्र्यांना भेटत असतात. महाराष्ट्राची अशी संस्कृती राहिली आहे. आम्हीही विरोधी पक्षात होतो, तेव्हा सत्ताधारी पक्षातील नेत्यांना आपली कामे घेऊन भेटत होतो, असे ते म्हणाले. अजित पवार यांनी यावेळी माळेगाव साखर कारखान्याच्या निवडणुकीवरही प्रतिक्रिया दिली. सहकार क्षेत्रातल्या निवडणुका या पक्षाचे चिन्ह व नावावर होत नाहीत. याआधीही अशा निवडणुकांमध्ये अनेक वेगळ्या विचारांचे लोक एकत्र येऊन निवडणूक लढले आहेत, असे ते म्हणाले.

# 'एअर इंडियाचे' कोसळले विमान

## पंतप्रधान नरेंद्र मोदी अहमदाबादच्या दिशेने रवाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहमदाबाद** : अहमदाबादच्या मेघानीनगर परिसरात एअर इंडियाचे विमान रहिवासी भागात कोसळले असून, सध्या बचावकार्य सुरू आहे. अपघातग्रस्त विमानात एकूण २४२ प्रवासी होते. त्यामध्ये १६९ भारतीय, ११ लहान मुलं, दोन नवजात बालकं, ५३ ब्रिटीश, एक कॅनेडियन, २१७ प्रौढ आणि सात पोर्तुगीज प्रवासी होते. तसेच १० क्रू मेंबर्स देखील होते. या विमानाने गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी हेही प्रवास करीत होते. दरम्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आणि



नागरी उड्डाण मंत्री राममोहन नायडू अहमदाबादच्या दिशेने रवाना झाले आहेत.

अहमदाबाद येथील प्रवासी विमान अपघातानंतर एअर इंडियाने १८००५६९१४४४ हा आपत्कालीन फोन क्रमांक जारी केला आहे. मेघानीजवळ कोसळलेल्या एअर इंडियाचं प्रवासी विमान टेकऑफच्या १० मिनिटांत कोसळल्याची धक्कादायक घटना घडली आहे. युद्ध पातळीवर रेस्क्यू ऑपरेशन राबवण्याचे आदेश मुख्यमंत्री पटेल यांनी दिले आहे. एअर ॲम्ब्युलन्स घटनास्थळी दाखल झाली असून बचावकार्य सुरु आहे. हे विमान

पान ४

### समस्त भारतीयांवर दु:खाचा डोंगर

एअर इंडियाच्या विमान अपघाताने संपूर्ण देश हादरला आहे. गुजरातच्या अहम दाबादहून लंडनला निघालेलं विमान मेघानीनगरात कोसळलं. विमान टेक ऑफ घेताच १० मिनिटांत कोसळल्याची माहिती हाती आली आहे. या विमानात एकूण २४२ प्रवासी होते. आतापर्यंत दुर्घटनाग्रस्त विमानातून ५० जणांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. मृतांमध्ये लहान मुलांचाही समावेश आहे. या अपघातातील मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# 'शेतकरी भवन'ला मान्यता द्या

## महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदेंचे निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : जामखेड तालुका कृषि उत्पन्न बाजार समिती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यासाठी बांधकामाचा प्रस्ताव कृषि उत्पन्न बाजार समिती यांनी सादर केला आहे. या मागणीच्या प्रस्तावास संचालक (पणन) यांनी तातडीने मान्यता द्यावी, असे निर्देश विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी दिले.

कर्जत व जामखेड येथील कृषि उत्पन्न बाजार समितीशी संबंधीत विषयांबाबत आढावा बैठक महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली काल, दि. १२ जून २०२५ रोजी विधान भवन, मुंबई येथे झाली. यावेळी बैठकीस सहकार व पणन विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, सह सचिव वि. ल. लहाने, कृषि उत्पन्न बाजार समितीचे पदाधिकारी तसेच पणन विभागाचे संचालक रसाळ व उपसंचालक निंबाळकर उपस्थित होते.



जामखेड येथील कृषि उत्पन्न बाजार समिती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यासाठी २२ एप्रिल, २०२५ रोजी शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे. सदर शेतकरी भवन उभारण्यासाठी शासन अनुदान ५० टक्क्याच्या मर्यादेत दिले जाणार असून उर्वरित ५० टक्के निधी बाजार समितीने स्वनिधी अथवा कर्जातून उपलब्ध करुन घ्यायचा आहे.

कर्जत येथील कृषि उत्पन्न बाजार समिती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन उभारण्यासाठीचा प्रस्ताव संचालक पणन यांच्यामार्फत शासनास सादर करण्यात यावा. तसेच बाजार समितीकडून नियमानुसार सादर होणाऱ्या अन्य बाबींवरील प्रस्तावास देखील तातडीने मान्यता दिली जावी, अशा सूचना सभापती महोदय यांनी दिल्या.

# अवैध खत विक्री करणे भोवले; गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : काल उपविभागीय कृषी अधिकारी प्रवीण गोसावी, खत निरीक्षक तथा जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अहिल्यानगर राहुल बाळासाहेब ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विभागाच्या पथकाने कृषी समृद्धी क्रॉप सोल्यूशन गट न ४०४ एमआयडीसी श्रीरामपूर येथे तपासणी केली. यामध्ये ५० किलोच्या वजनाच्या ३९५ गोण्या, १० किलो वजनाच्या ५ बादल्या आणि १ लिटरच्या कीटकनाशकच्या १० बॉटल एवढा साठा मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी ठेवण्यात आल्याचे आढळून आले आहे.

यावेळी तंत्र अधिकारी उपविभागीय कृषी अधिकारी अमोल काळे, तालुका कृषी अधिकारी उल्हास राक्षे, मोहीम अधिकारी निलेश अभंग यांच्या उपस्थितीत गोदामाची पाहणी करण्यात आली. यामध्ये योगेश नगरकर यांच्याकडे या खत विक्री आणि साठवणुकीसाठी कोणतेही अधिकृत परवाने अथवा आवश्यक दस्तऐवज नसल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे पंचासमक्ष पंचनामा करून एकूण २,८२,००० रूपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याबाबत श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात अमोल काळे यांनी फिर्याद दिली आहे.

# नागरिकांनो, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधा

## आयुक्त डांगे यांचे आवाहन; मदतकार्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर शहरात झालेल्या वादळी पावसामुळे अहिल्यानगर शहर व उपनगर परिसरात अनेक ठिकाणी छोटी मोठी झाडे उन्मळून पडली. शहरातील वसाहती, प्रमुख रस्त्यांवर झाडांच्या फांद्या, पाने पडून कचरा साचला होत. महानगरपालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेमार्फत रात्रीपासूनच पडलेली झाडे हटवून रस्ता वाहतुकीसाठी खुला करण्यासाठी काम सुरू झाले आहे. अनेक ठिकाणी रात्रभर यंत्रणा कार्यरत होती.



आता गुरुवारी सकाळपासून शहरातील रस्ता वसाहतींमध्ये पडलेला पाळा पाचोळा, फांद्या हटवण्याचे काम सुरू करण्यात आल्याची माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.

वादळी वाऱ्यामुळे महावीर कलादालन, वैभव हॉटेल, कानडे मळा, बोल्हेगाव, मुकुंदनगर, भिस्तबाग चौक, पंकज कॉलनी, नवले नगर, रेल्वेस्टेशन, कातोरे वस्ती बोल्हेगाव अशा विविध ठिकाणी मोठी झाडे पडली. काही ठिकाणी वाहतूक ठप्प झाली होती. तर काही ठिकाणी विद्युत वाहक तारांवर झाडे व फांद्या पडल्या.

स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधींकडून मिळालेल्या सूचनेनुसार संबंधित भागात महानगरपालिकेकडून तत्काळ पथक पाठवून मदतकार्य सुरू करण्यात आले.

पान ४

# मुख्यमंत्र्यांची बनावट सही

## चाळीसगावमधील तरुणीची फसवणूक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चाळीसगाव** : मुख्यमंत्र्यांची बनावट स्वाक्षरीचा वापर करत मंत्रालयात नोकरीचे आमिष दाखवत एका युवतीची फसवणूक झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. चाळीसगाव तालुक्यातील तिघांविरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच या प्रकरणाचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.

चाळीसगाव तालुक्यातील सायगाव येथील एका युवतीला मंत्रालयातील लिपिक पदावर नियुक्ती मिळवून देण्याचे आमिष दाखवण्यात आले होते. तिला दिले गेलेले नियुक्ती पत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नावाने बनावट लेटरहेडवर व

पान ४

# कर्जत क्रीडा संकुलाचा निर्णय घ्या : बावनकुळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कर्जत तालुका क्रीडा संकुलाच्या जागेचा निर्णय तालुका क्रीडा संकुल समितीने १५ दिवसाच्या आत बैठक बोलावून घ्यावा. तसे न झाल्यास जिल्हा क्रीडा संकुल समिती याबाबतचा निर्णय घेऊन शासनाला कळवेल. त्यानंतर शासन स्तरावरुन याबाबतची पुढील सर्व कार्यवाही १५ दिवसाच्या आत करण्यात यावी, असे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित अधिकारी यांना दिले.



कर्जत येथील क्रीडा संकुलाच्या जागेसंदर्भात विधानभवन, मुंबई येथे सभापती प्रा. राम शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आलेले होते.

तसेच कर्जत तालुका क्रीडा संकुलासाठी भांडेवाडी येथील जागेला मंजुरी मिळाली होती. त्यानुसार कामास सुरुवात करण्यात आलेली

पान ४

# ...अखेर 'बापट'च्या संचालकांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : पारनेर तालुक्यातील पारनेर येथील सहकार क्षेत्रातील नामांकित असलेल्या सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या संचालक मंडळावर अखेर ठेवीदारांच्या रकमेचा अपहार केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

पारनेर तालुक्यातील एलआयसीचे प्रसिद्ध विमा एजंट म्हणून कार्यरत असलेले एक ठेवीदार सुभाष आग्रे यांनी सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या चेअरमन व संचालक मंडळ आर्थिक फसवणुकीचा आरोप करत पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सुभाष आग्रे यांनी त्यांच्या पत्नी शशिकला आग्रे यांच्या नावे सेनापती बापट पतसंस्थेच्या बचत खाते आणि मुदत ठेवीमध्ये ३ लाख ५० हजार रुपये गुंतवले, या व्यतिरिक्त त्यांनी त्यांच्या नातेवाईक मित्रमंडळींचे असे २९ ठेवीदारांचे २ कोटी ५० लाख ३८ हजार ६१३ रुपये पतसंस्थेत गुंतवले होते. पण ज्या-ज्यावेळी रक्कम मागितली, त्या-त्यावेळी ती मिळाला मिळाली नाही. या रकमेचा अपहार झाल्याचा आरोप ही आग्रे यांनी केला आहे.

ठेवीदार सुभाष आग्रे व त्यांच्या पत्नी शशिकला आग्रे यांनी सेनापती बापट पतसंस्थेच्या अळकुटी शाखेत २०२१ मध्ये खाते उघडले होते. त्यावेळी त्यांनी १ लाख ५० हजार रुपये ठेव पावत्यांमध्ये गुंतवली होती. त्यावेळी संस्थेच्या संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांनी त्यांना या रकमेवर त्यांना जास्त व्याज देण्याचे आश्वासन दिले. त्यामुळे त्यांनी २०२२ मध्ये या

पान ४




सेनापती बापट मल्टीस्टेट पतसंस्थेच्या संचालक मंडळावर गुन्हा दाखल करण्यात आला असून यासंदर्भात कायदेशीर बाजू पाहून पुरावे गोळा करण्याचे काम पारनेर पोलीस करत आहे . ठेवीदारांनी कारवाईची मागणी केली असून पतसंस्थेच्या व्यवस्थापनावर फसवणुकीचा गंभीर आरोप असल्यामुळे याप्रकरणाच्या कायदेशीर कारवाईकडे संपूर्ण पारनेर तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.

# वारकऱ्यांसाठी कोट्यवधींचा निधी मंजूर

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आषाढी यात्रेकरीता अहिल्यानगर जिल्ह्यातून मार्गस्थ होणाऱ्या पालख्या समवेत असलेल्या वारकऱ्यांच्या सुविधांसाठी जिल्ह्याकरीता राज्य सरकारने २ कोटी ६१ लाख ८० हजार रुपयांचा निधी मंजूर केला असल्याची माहिती जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून सदर निधी उपलब्ध होणार असून, या निधीतून वारकऱ्यासाठी वॉटरफ्रूफ मंडप, शौचालय, स्नानगृह, पिण्याचे पाणी, वैद्यकीय सुविधा आणि ग्रामपंचायत सहाय्य अनुदान दिले जाणार आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातून पैठण येथील संत एकनाथ महाराज, त्र्यंबकेश्वर येथील संत निवृतीनाथ महाराज, पिंपळनेर येथून संत निळोबाराय महाराज या महत्वपूर्ण देवस्थानाच्या पालख्या बरोबरच स्थानिक पातळीवरील सुमारे १६० पालख्या पंढरपूरकडे दरवर्षी जात असतात. यामध्ये महिला-पुरूष वारकऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असते. प्रवासा दरम्यान मार्गावर गैरसोय होवू नये, म्हणून पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी मागील दोन वर्षापासून जिल्हा प्रशासनाच्या सहकाऱ्याने वारकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.



जिल्हाधिकारी कार्यालयात मंत्री विखे पाटील यांच्या उपस्थितीत पालखी नियोजन सोहळ्याची बैठक संपन्न झाली होती. या बैठकीत वरीष्ठ अधिकाऱ्यासह प्रमुख देवस्थानाचे प्रतिनिधी जिल्ह्यातील दिंड्याचे प्रमुख उपस्थित होते. यामध्ये पालखी मार्गावर येणाऱ्या अडचणी मंत्री विखे पाटील यांनी जाणून घेतल्या होत्या. मागील वर्षापासून जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालख्या जाणाऱ्या मार्गांवरुन सर्वसुविधा पुरविण्यात येत असून, यासाठी विविध विभागांचे अधिकारी समन्वयक म्हणून काम करतात. अहिल्यानगर जिल्ह्याने सुरु केलेला हा पॅटर्न राज्यातही चर्चेत आला आहे. सोलापूर जिल्ह्यातही पालख्यांकरीता याच पद्धतीचे नियोजन करण्यात येवू लागले आहे.

यामध्ये प्रामुख्याने पावसाचे दिवस असल्याने मुक्कामाच्या ठिकाणी वॉटरप्रुफ मंडपाची मागणी, रस्त्याचे प्रश्न, शौचालय, वैद्यकीय सुविधा आणि पिण्याच्या पाण्याबाबतच्या समस्या वारकऱ्यांनी बोलून दाखवल्या होत्या. या सर्व व्यवस्थांमध्ये प्रशासन कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही मंत्री विखे पाटील यांनी दिली होती.

> राज्य सरकारकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश अधिकाऱ्याना दिले होते. सादर झालेल्या प्रस्तावांचा पाठपुरावा करून ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून सुमारे २ कोटी ६१ लाख ८० हजार रूपयांचा निधी जिल्हा प्रशासनाला उपलब्ध करून दिला आहे. शासनाने मंजूर केलेल्या निधीतून वारकऱ्यांना सर्व मार्गावर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.
>
> **- राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदा तथा पालकमंत्री**

# कोल्हारमध्ये न्यू इंग्लिश स्कूलमध्ये स्नेहमेळावा उत्साहात



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** साधारण पहिलीच्या वर्गापासून एकत्र असलेले बालमित्र दहावीच्या वर्गानंतर विविध क्षेत्रात शिक्षण घेऊन नोकरी व्यवसायानिमित्त बाहेरगावी गेले. परंतु सण, उत्सवानिमित्त एकत्र येत असत. दरम्यान २ वर्षांपूर्वी अनेकांनी एकमेकांना गेट-टुगेदर करण्याची सूचना मांडली व त्याप्रमाणे २०२३ मध्ये तब्बल ३२ वर्षांनंतर सर्व वर्ग शिक्षकांसह मोठ्या उत्साहात गेट-टुगेदर झाले. त्यावेळी विद्यार्थ्यांकडून सर्व शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

गुरुजन आणि विद्यार्थी या दोघांसाठीही हा प्रसंग खूपच भावुक होता. १९९१ च्या बॅचचे विद्यार्थी मित्र मैत्रिणी यांनी या निमित्ताने शाळेच्या विकासासाठी एक लाख एक हजार कृतज्ञता निधी शाळेच्या प्राचार्यांना सुपूर्त केला.

त्यानंतर बरोबर दोन वर्षांनंतर राहाता तालुक्यातील कोल्हार बुद्रुक येथील रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल कोल्हार बुद्रुक येथे १९९०-९१ दहावीचा बॅचचा स्नेहमेळावा उत्साहात पार पडला. दहावीचा वर्ग म्हंटला कि शांतता, शिस्त. अगदी या शांततेला शिस्तीलाही एक गंध होता वास होता. सर्वांनी २ मिनिटे डोळे मिटून आणि पुन्हा एकदा त्या शाळेतील वर्गाच्या वातावरणाची अनुभूती घेतली.

विद्यार्थी मित्र नाशिक, पुणे, मुंबई ठाणे आणि अगदी सुरत सारख्या ठिकाणावरून या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित राहिले. यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल मगर आणि योगेश मेहरे यांनी केले. तर आभार अशोक गुरव यांनी मानले.

# सिंचनापासून वंचित राहिलेल्या गावांचे होणार सर्वेक्षण

## मुंबईतील जलसंपदा मंत्र्यांच्या बैठकीनंतर आ. अमोल खताळ यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील साकूर पठार भागातील दिर्घकाळ प्रलंबित पाणी प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी मुंबई येथे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील मंत्रालयातील दालनात विशेष बैठक पार पडली. या बैठकीत जलसंपदा विभागाने बॅरेज बंधाऱ्यांचा पर्याय समोर आणला आहे. या माध्यमातून साकूर पठारभागाचा पाणी प्रश्न कायमस्वरुपी मार्गी लागणार असून, गेल्या अनेक वर्षांपासून पाण्यावाचून वंचित असलेल्या पठारभागाला दिलासा मिळणार आहे.



या बैठकीला आ. अमोल खताळ, भाजपा तालुकाध्यक्ष गुलाब भोसले, भाजप राज्य कार्यकारिणी सदस्य रऊफ शेख, रवी दातीर, ॲड. अमित धुळगंड यांच्यासह शिष्टमंडळ उपस्थित होते.

संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील मोरवाडी धरणाच्या संदर्भात अनेक वर्षां पासून या भागातील नागरिकांची मागणी होती. याआधी भूसंपादनही झाले होते, मात्र धरण न झाल्याने जमीन शेतकर्यांना परत देण्यात आली होती. २००४ मध्ये तत्कालीन पाटबंधारे राज्यमंत्री असताना कोणाच्या सांगण्यावरून न्यायालयाला पत्र देऊन जायकवाडीच्याखाली कुठलेच धरण होणार नाही, असे लेखी हमीपत्र राज्य शासनाच्या वतीने दिले गेलेले आहे. परंतु साकुर पठार भागासह तालुक्यातील पाणी प्रश्न कोणत्याही परिस्थितीमध्ये सोडवायचा असल्याने आ. खताळ यांनी यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे आग्रह धरला आहे. यानुसार संगमनेर तालुक्याच्या साकुर पठार भागासह तालुक्यातील निमोण व तळेगाव या सर्व दुष्काळी भागाचे नव्याने सर्वेक्षण करून एक महिन्या च्या आत अहवाल सादर करण्याचे निर्देश जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे यांनी दिल्याची माहिती आ. खताळ यांनी दिली आहे.

सर्वेक्षण अहवाल आल्यानंतर पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर पुन्हा एकदा बैठक घेउन या भागातील पाण्याचा प्रश्न कायम स्वरूपी सोडविण्यासाठी प्रयत्न केले जातील असा विश्वास दिला आहे.

**- अमोल खताळ, आमदार**

### नागरिकांनी, गर्दीच्या ठिकाणी सावध रहा

निमगाव भोजापूर धरणाची उंची, पाणी नियोजन, व्यवस्थापन संदर्भातही चर्चा झाली असून, त्यातून पाणी मिळव ण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. निळवंडे डावा व उजवा कालवा, तसेच राहठीचा दरा येथे धरण बांधण्या च्या बाबतही विचार सुरू आहे. तुम्हाला कोणत्याही परिस्थितीत पाणी मिळणारच आहे असा ठाम विश्वास व्यक्त करत ते म्हणाले की पाण्यापासून वंचित राहणार्या सायखिंडी, कऱ्हे व इतर सर्व गावाचा सर्वे करून भविष्यात एकही गाव पाण्यावाचून राहणार नाही, यासाठी जलसंपदामंत्री विखे पाटील आणि मी स्वतः प्रयत्नशील राहू असा विश्वास आ. खताळ यांनी व्यक्त केला आहे.

# गरजूवंत रुग्णांना आर्थिक मदत व शालेय साहित्याचे वाटप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने गरजूवंत रुग्णांना वर्षभर वैद्यकीय मदत देण्याचे काम केले आहे या माध्यमातून रुग्ण आपल्या आजारपणाची प्राथमिक तपासणी करून घेतो व त्यानुसार डॉ. वैद्यकीय उपचार करत असतात ड. धनंजय जाधव यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे त्यांनी नेहमीच समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करण्याचे काम केले आहे. स्व. कृष्णा जाधव यांच्या विचाराचा वारसा ते पुढे चालवीत आहे असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.

# पोलिसांकडून शेकडो शेतकऱ्यांना अटक?

## शेती महामंडळाच्या जमिनीत बाभळी काढताना आकारीपडीत शेतकऱ्यांचे आंदोलन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** आकारी पडीत शेतकऱ्यांना जमिनी परत केल्याशिवाय शेती महामंडळाच्या जमिनी निविदा पद्धतीने कोणाला देऊ नये. अथवा सार्वजनिक कामासाठी सुद्धा देऊ नये, अशा शेतकऱ्याच्या मागण्या आहेत त्या संदर्भात उच्च न्यायालयात प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. त्यासाठी दोन तीन वेळा आकारी पडीत शेतकऱ्यांनी आंदोलन केल्याने शेती महामंडळ जमिनीबाबत कोणतीही कार्यवाही झाली नाही.



दि १२ जून रोजी बीसी नाला परिसरात अलीकडे व पलीकडे एकवाडी पाचवाडी हद्दीत मुठेवाडगाव रोडलगत शेती महामंडळाने त्या हद्दीतील वेड्या बाभळी, काटे, झाडे काढण्याचे काम निविदाव्दारे ठेकेदाराला दिले होते. त्याप्रमाणे जेसीपी मशीनने काट्या झाडे काढण्याचे काम सुरु झाले. त्यास आकारी पडीत शेतकरी यांनी विरोध दर्शविला व प्रथम आमचा प्रश्न मार्गी लावा, असे सांगितले.

उच्च न्यायालयात शेतकऱ्यांचे बाजूने निर्णय झालेला असताना व मंत्रिमंडळात धोरणात्मक निर्णय झाला असताना शेती महामंडळ पोलीस प्रशासन यांची मदत घेऊन न्यायालय प्रश्नात अडथळा निर्माण करीत आहे, असे शेतकरी सांगतात. १० महिने झाले तरी अद्याप कार्यवाही नाही.

यावेळी हरिगाव ब्राम्हणगाव फाटा शेती महामंडळ कार्यालयाजवळ २०० शेतकऱ्यांनी रस्ता रोको आंदोलन केले. दोन्ही ठिकाणी आंदोलन केल्याने श्रीरामपूर शहर पोलीस विभागाने शांततेची भूमिका मांडली. मात्र प्रतिसाद न मिळाल्याने शेवटी पोलीस वाहनातून श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनला शेतकऱ्यांना अटक करून आणण्यात आले. त्यामुळे शेतकरी वर्गात असंतोष निर्माण झाला.

त्यावेळी पोलीस निरीक्षक नितीन देशमुख, उपविभागीय अधिकारी बसवराज शिवपूजे,आदी उपस्थित होते.


### आजपासून करणार आंदोलन

सदरील आंदोलन शेतकरी संघटना राज्य उपाध्यक्ष व उच्च न्यायालय ॲड. अजित काळे यांचे नेतृत्वाखाली सुरु आहे. या प्रश्नावर योग्य निर्णय न झाल्यास शेतकरी आपल्या जनावरासह आज, १३ जूनपासून आंदोलन करणार आहेत. हा संघर्ष चिघळण्याची शक्यता आहे, याची दक्षता प्रशासनाने घ्यावी अशी मागणी आहे.

# अनिल शिंदे काळाच्या पडद्याआड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांचे मोठे बंधू व रहिमपूर येथील प्रगतशील शेतकरी भिमाजी बाबुराव शिंदे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले आहे. मृत्यू समयी



त्यांचे वय ८२ वर्षे होते.

रहिमपूर येथील प्रगतशील शेतकरी व माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांचे खांदे समर्थक भिमाजी बाबुराव शिंदे यांनी सामाजिक व कृषी क्षेत्रामध्ये या परिसरामध्ये उल्लेखनीय काम केले. रहिमपूर गावच्या विविध संस्थांच्या उभारणीमध्ये त्यांचा मोठा वाटा राहिला. अमृतवाहिनी बँकेचे संचालक अण्णासाहेब शिंदे व अमृतवाहिनी शेती व शिक्षण विकास संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे यांचे ते बंधू होते. त्यांच्या पश्चात मुलगा प्रा. नवनाथ शिंदे, गोरक्षनाथ शिंदे, तीन मुली, भाऊ, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

त्यांच्या निधनाबद्दल माजी मंत्री बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे, इंद्रजीत थोरात, डॉ. जयश्री थोरात, दुर्गाताई तांबे यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ व नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे.

# आईच्या स्मृतीसाठी 'एक झाड' अनोखा उपक्रम

## आईच्या आठवणींचे सानिध्य झाडांच्या रुपात लाभणार : पालवे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जय हिंद फाउंडेशनच्या वतीने कोल्हार गावात एक झाड आईच्या नावाने या प्रेरणादायी उपक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. या उपक्रमांतर्गत वडाच्या रोपांची लागवड करून मातृप्रेमाला वृक्षारोपणाच्या माध्यमातून अभिव्यक्त करण्याचा स्तुत्य प्रयत्न हाती घेण्यात आला आहे.

या उपक्रमाची सुरुवात कोल्हार गावच्या दिवंगत सरपंच स्वर्गीय कौसाबाई पालवे यांच्या स्मरणार्थ करण्यात आली. त्यांच्या नावाने वडाचे झाड लावून या अभियानाचा प्रारंभ झाला. कार्यक्रमात गावचे उपसरपंच गोरक्षनाथ पालवे, रमेश पालवे, माजी सरपंच बाबाजी पालवे, राजेंद्र पालवे, मदन पालवे, किरण पालवे, कृष्णा बाळासाहेब पालवे, जय हिंद फाउंडेशनचे शिवाजी पालवे, शिवाजी गर्जे, बाबाजी नाथा पालवे, मुख्याध्यापक देविदास गीते, दिनकर पालवे, रोहीदास पालवे, सन्नी गर्जे, अमोल पालवे आदी मान्यवर उपस्थित होते.



### आईच्या नावाने एक झाड लावा

एक झाड आईच्या नावानेफ ही संकल्पना केवळ वृक्षारोपणापुरती मर्यादित नसून, ती आपल्या जीवनात आईच्या स्थानाची आठवण करून देणारी जिवंत प्रतीक ठरणार आहे. या अभियानात सहभागी होवून आईच्या नावाने एक झाड लावण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

स्व. कौसाबाई पालवे यांनी सरपंच पदाची जबाबदारी निभावताना गावाच्या सर्वांगीण विकासासाठी उल्लेखनीय कार्य केले. त्यांच्या कार्यकाळात अनेक विकासकामे मार्गी लागली आणि गावाला आदर्श गाव बनवण्याचा मार्ग त्यांनी तयार केला. त्यांच्या पश्चात सहा मुले, एक मुलगी व २१ नातवंडांचा मोठा परिवार असून आज संपूर्ण पालवे कुटुंबाला त्यांच्या आठवणींचे सानिध्य झाडांच्या रुपात लाभणार आहे, असे शिवाजी पालवे यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले.

# 'ग्राहक पंचायत' प्रांत कोषाध्यक्षपदी जगदाळे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** पारनेर तालुक्यातील बाभूळवाडे येथील श्री केदारेश्वर देवस्थानचे विश्वस्त व सामाजिक कार्यकर्ते विलास जगदाळे यांची अखिल भारतीय ग्राहक पंचायत मध्य महाराष्ट्र प्रांताच्या कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.



अखिल भारतीय ग्राहक पंचायतीची मध्य महाराष्ट्र प्रांताची बैठक पुणे येथे संपन्न झाली. या बैठकीला केंद्रीय कार्यकारिणी सदस्य व मध्य महाराष्ट्र प्रांताचे क्षेत्रीय पालक सूर्यकांत पाठक, महाराष्ट्र प्रांताचे क्षत्रिय संघटन मंत्री नितीन काकडे यांच्या उपस्थितीत मध्य महाराष्ट्र प्रांताच्या अध्यक्षपदी बाळासाहेब औटी यांची निवड करण्यात आली. तर मध्य महाराष्ट्र प्रांताच्या कोषाध्यक्षपदी पारनेर तालुक्यातील बाभूळवाडे येथील विलासराव जगदाळे व प्रांत कार्यकारिणी सदस्य म्हणून अहिल्यानगर चे अतुल कुऱ्हाडे यांची निवड करण्यात आली. या निवडी तीन वर्षांकरिता करण्यात आल्या आहेत.

यावेळी मध्य महाराष्ट्र प्रांताचे नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून संघटन मंत्रीपदी संदीप जंगम, सचिव डॉ. अनिल देशमुख, उपाध्यक्ष वंदना तोरणे, राजश्री दीक्षित, सहसचिव दीपक इरकल, ड. तुषार झेंडे, सहकोषाध्यक्ष ज्ञानेश्वर उंडे, प्रांत कार्यालयीन प्रमुख विलास लेले, कार्यकारिणी सदस्य अतुल कुहाडे, प्रसाद बुरांडे, विनोद भरते, उर्मिला येळगावकर, भारती अग्रवाल, शुभदा नागपूरकर यांची निवड करण्यात आली.

### जगदाळे यांचे कार्य कौतुकास्पद

विलासराव जगदाळे हे ग्राहक पंचायतीसाठी ३० वर्षांपासून काम करत आहे. आजपर्यंत त्यांनी पारनेर तालुका संघटक या पदापासून ते तालुकाध्यक्ष, अहिल्यानगर जिल्हा सहसंघटक, जिल्हा संघटक, जिल्हाध्यक्ष, मध्य महाराष्ट्र प्रांत सहसचिव, पर्यावरण आयाम प्रमुख अशा विविध पदांवर काम केले आहे. जगदाळे यांच्या या निवडीने पारनेर तालुक्याला प्रथमच राज्य स्तरावर काम करण्याची संधी प्राप्त झाली असून त्यांच्या निवडीचे तालुका व जिल्हयातून स्वागत होत आहे.

# निंबळक-नागापूर रस्त्याची दुरवस्था

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर-मनमाड मार्गावरील नागापूर चौक येथील सन फार्मा कंपनीपासून ते निंबळक हद्दीतील अपोलो कंपनीपर्यंतच्या रस्त्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, सद्यस्थितीत या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे.

# खरीप हंगाम पूर्वतयारी अंतर्गत जनजागृती कार्यशाळा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले :** अकोले तालुक्यातील जायनावाडी, एकदरे, खिरविरे येथे खरीप हंगाम पूर्वतयारी अंतर्गत विविध मोहिमा व 'राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान'अंतर्गत जनजागृती कार्यशाळा आयोजित करण्यात आली.जायनावाडी येथे राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान अंतर्गत महत्त्वपूर्ण जनजागृती कार्यशाळा उत्साहात पार पडली. या कार्यशाळेला ग्रामस्थांसह बचत गटातील महिला शेतकरी बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात काळू भांगरे यांच्या प्रास्ताविकाने झाली. त्यानंतर सहाय्यक कृषी अधिकारी नाथु शेंडे यांनी राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाची सविस्तर ओळख करून दिली. त्यांनी या अभियानाचे फायदे आणि महत्त्व समजावून सांगितले. तसेच नैसर्गिक शेती ही काळाची गरज असून जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले. सहाय्यक कृषी अधिकारी अरुण बांबेरे यांनी शेतकऱ्यांना मातीचा नमुना कसा काढावा, याबद्दल मार्गदर्शन केले.त्यांनी भात बियाणे बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक करून दाखवले आणि भात पिकाच्या रोपवाटिकेसाठी गादी वाफा कसा तयार करावा याविषयी माहिती दिली.



# जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या अध्यक्षपदी गायकवाड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या अध्यक्षपदी सबाजीराव महादू गायकवाड यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच व्हा. चेअरमनपदी अल्लाउद्दीन सिराजुद्दीन काझी यांची निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या पंचवार्षिक निवडणूक गेल्या महिन्यात बिनविरोध पार पडली. या पार्श्वभूमीवर चेअरमन व व्हा. चेअरमन निवडीची प्रक्रिया निवडणूक अधिकारी व्ही.



के मुटकुळे व पालवे यांच्या अध्यक्षतेखाली दि. ९ जून रोजी संस्थेच्या कार्यालयात झाली.

यावेळी गायकवाड यांची अध्यक्षपदी तर व्हा. चेअरमनपदी काझी यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा मुटकुळे व पालवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संचालक प्रशांत गायकवाड, प्रकाश सदाफुले, अर्चना म्हस्के, ज्योती गोलेकर, अशोक राशिनकर, विठ्ठल अभंग, रवींद्र बोरावके, शिवाजीराव कपाळे, नितीन चासकर, धनंजय गाडेकर, अशोक थोरे आदी उपस्थित होते.

# जामखेडमध्ये १५ जूनला जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रा

## सिंदखेड राजा ते स्मृतीस्थळ पाचाड निघणार जिजाऊ ज्योत

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रा दि. १४ जून ते १७ जून असे चार दिवसीय स्मृतिज्योत रथयात्रेचे नियोजन केले असून दि. १५ जून रोजी रथयात्रा जामखेड शहरात येणार आहे. तरी सर्व जिजाऊ शिवभक्त समाज बांधवांनी जिजाऊ रथयात्रेच्या स्वागतासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन सकल मराठा समाज व मराठा सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

राष्ट्रमाता माँ जिजाऊंच्या ३५१ व्या पुण्यतिथीनिमित्त



जिजाऊंचे जन्मस्थळ मातृतीर्थ सिंदखेडराजा ते समाधीस्थळ पाचाड (किल्ले रायगड) येथे यदुकुलभूषण राजे लखुजीराव जाधवराव तसेच परिसरातील लखुजीराजेंच्या वंशजांच्यावतीने जिजाऊ स्मृतिज्योत रथयात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.

पाचाड येथील जिजाऊंच्या समाधीस्थळी पुण्यतिथीच्या दिवशी सिंदखेडराजा येथील पाच विहिरींच्या जलाने जिजाऊंच्या समाधीस जलाभिषेक करण्यात येणार असून दि. १४ जून रोजी सकाळी ८.३० वाजता मातृतिर्थ सिंदखेडराजा येथून रथयात्रेचे प्रस्थान होणार आहे.

सर्व जिजाऊ शिवभक्त समाज बांधवांनी जिजाऊ रथयात्रेच्या स्वागतासाठी उपस्थित रहावे असे आवाहन सकल मराठा समाज व मराठा सेवा संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

### चार दिवसीय स्मृतिज्योत रथयात्रेचे नियोजन

दि. १४ जून ते १७ जून असे चार दिवसीय स्मृतिज्योत रथयात्रेचे नियोजन असून दि. १५ जून रोजी रथयात्रा जामखेड शहरात येणार आहे. सकाळी ११ वाजता सकल मराठा समाज व मराठा सेवा संघ,जामखेड यांच्यावतीने बीड रोड कॉर्नर या ठिकाणी जिजाऊ स्मृती ज्योत रथयात्रेचे पूजन व तेथून शोभायात्रेस प्रारंभ होऊन, बस स्टँड येथे सांगता होणार आहे.

# स्टार्टअपची निर्मिती प्रगतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण

## जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील; प्रवरा अभियांत्रिकीत शोधनिबंध परिषद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** प्राध्यापक संशोधक आणि विद्यार्थ्यांमधील संशोधनाच्या नवसंकल्पना स्टार्ट अपमधील योगदानासाठी महत्वपूर्ण ठरत आहेत. सर्वच क्षेत्रात स्टार्टअपची होणारी निर्मिती राज्याच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरेल, असा विश्वास जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी व्यक्त केला.

### नोकरी देणारे विद्यार्थी घडविणार: विखे

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शिक्षणासोबतच आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र कार्यरत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी, ग्रामीण कारागीर आणि शिक्षणापासून वंचित राहिलेल्या घटकाला वेगवेगळे प्रशिक्षण देऊन त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणण्याचे होत आहे. नोकरी करणारे नव्हे तर नोकरी देणारे विद्यार्थी घडवण्यावरती संस्थेचा भर असल्याचे त्यांनी सांगत सहकाराच्या माध्यमातून या ठिकाणी उभ्या राहिलेल्या विविध उपक्रमाची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थे अंतर्गत प्रवरा ग्रामीण अभियांत्रिकी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय स्तरावरील शोधनिबंध परिषद आणि स्टार्टअप इनोव्हेशन परीषदेचे आयोजन करण्यात आले आहे. दोन दिवसांच्या परीषदेचे उद्धाटन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या उपस्थितीत दूरदृष्य प्रणालीद्वारे झाले. सर विश्वेश्वरय्या टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. विद्याशंकर एस., महाराष्ट्र शासनाच्या कॉलेज ऑफ इंजीनियरिंग टेक्नॉलॉजीकल यूनिवर्सिटी पुणेचे कुलगुरू डॉ. सुनिल भिरुड, महात्मा गांधी मिशन या युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, आऊटस्टँडिंग सायंटिस्ट डॉ. आर. एस. शिंदे, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, प्रवरा बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे , संस्थेचे संचालक शिवाजी जोंधळे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ शिक्षण संचालक डॉ. प्रदीप दिघे, प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने, परिषदेचे समन्वयक डॉ. संजय कुरकुटे आदींसह विविध महाविद्यालयाचे प्रतिनिधी परीषदेत सहभागी झाले आहेत.




मंत्री विखे पाटील म्हणाले की, विकसित भारत ही संकल्पना पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या माध्यमातून पुढे जात आहे. देशांमध्ये आणि विशेषता राज्यांमध्ये इनोव्हेशन आणि स्टार्टअपच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारत उभा राहण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. या परिषदेच्या माध्यमातून सादर होणारे विविध शोध निबंध, पेटंट, नवकल्पना या राज्याला दिशादर्शक ठरतील.

डॉ. विद्याशंकर एस यांनी सहकार शिक्षण, ग्रामीण क्षेत्रात प्रवरेचे काम हे महत्त्वपूर्ण आहे. प्रवरा प्रिझमच्या माध्यमातून देखील प्रवरेने चांगले काम निर्माण केले आहे. यामुळे ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात उद्योग आणि रोजगाराच्या संधी वाढणार आहेत. परिषदेच्या माध्यमातून होणारे संशोधन हे देशाच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरेल, असे सांगितले. माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी संस्थेच्या विविध उपक्रमाची माहिती देत भारताला पुढे जाण्याची गरज आहे. आज अमेरिकेमध्ये ७५ टक्के संशोधन होत असले तरी त्या संशोधनांमध्ये भारताचा वाटा हा महत्त्वपूर्ण आहे. कार्यक्रमाचे प्रस्ताविक प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी केले तर या परिषदेचा उद्देश परिषदेचे समन्वयक डॉ. संजय कुरकुटे यांनी विषद केला.

# अवैधरित्या गुटखा विक्री; दोघांवर गुन्हा दाखल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** अवैधरित्या सुगंधी गुटखा विक्री करणाऱ्या दोन इसमांवर नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

११ जून रोजी परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक संतोष खाडे यांना गुप्त बातमीदाराकडून खात्रीशीर बातमी मिळाल्याने सदर ठिकाणी जाऊन छापा टाकला असता, सदर टपरीच्या आडोशाला दोन इसम एक पिशवी घेऊन दिसले. त्यांना त्यांचे नाव आणि गाव विचारले असता, त्यांनी दानिश रियाज पठाण व सईद शौकत पटेल (दोन्ही रा. नेवासा खुर्द) असे सांगितले.



त्यांच्या ताब्यातील पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता, त्यामध्ये सुगंधी तंबाखू / गुटखा असे एकूण ३२०० रुपये किमतीचा मुद्देमाल मिळून आला. याप्रकरणी वरील दोन इसमांवर नेवासा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

परिविक्षावधीन पोलीस उपाधिक्षक संतोष खाडे, पोलीस हवालदार संतोष राठोड, पोलीस कॉन्स्टेबल भारत बोडके, पोलीस कॉन्स्टेबल सलमान शेख, सुनील पालवे, श्री. दहिफळे यांच्या पथकाने सदरची कामगिरी केली.

# महावितरण विरोधात आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** शहरात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाविरोधात सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने निवेदन देऊन त्वरित सुधारणा न झाल्यास टाळे ठोक आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

यावेळी कृती समितीचे अध्यक्ष प्रा. किसन चव्हाण, भाजप सरचिटणीस अरुण मुंढे, अ‍ॅड. थोरात, माजी उपनगराध्यक्ष वजीर पठाण, नगरसेवक कमलेश गांधी, नगरसेवक दिगंबर काथवटे, नगरसेवक अजय भारस्कार, अ‍ॅड. कणगरे, नगरसेवक अंकुश कुसळकर, वंचितचे तालुकाध्यक्ष प्यारेलाल शेख यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी शिष्टमंडळाने तालुका कार्यकारी अभियंता पुरोहित तसेच शहर अभियंता पगारे यांची भेट घेतली

शहर व तालुक्यात सुरू असलेल्या विजेच्या लपंडावाबाबत धारेवर धरले. यावेळी वायरमन हे कायम उडवाउडवीची उत्तरे देतात. दिवसा व रात्री नेहमी वीज बंद असते. याबाबत त्वरित सुधारणा करावी, अन्यथा वीज वितरण कार्यालयाला टाळे ठोक आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला

# सोयाबीन ४१९९ रुपये क्विंटल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** राहाता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोल्हार बुद्रुक येथील उपबाजारात बुधवारी सोयाबीनची ५ क्विंटल आवक झाली. सोयाबीन ४१९९ रुपये प्रति क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. तसेच कोल्हार उपबजारात गव्हाची २ क्विंटल आवक झाली. गहू सरासरी २५२५ रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आला. बाजरीची १ क्विंटल आवक झाली. बाजरी २१०० रुपये क्विंटल दराने खरेदी करण्यात आली. मक्याची २ क्विंटल आवक झाली. मका कमीत कमी २००० रुपये तर जास्तीत जास्त २२५० रुपये प्रती क्विंटल दराने खरेदी करण्यात आल्याची माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.

# हरेगाव येथे शिक्षक उद्‌बोधन शिबीर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** प्रजा जागृती शिक्षण संस्था संचलित शिक्षक उदबोधन शिबीर गुरुवारी सकाळी १० ते सायंकाळी ४.३० वाजेपर्यंत संत तेरेजा चर्च हरिगाव येथे संपन्न झाले. या शिबिरासाठी प्रजा जागृती शिक्षण संस्थेमधून मराठी मेडियमच्या नऊ शाळा व तीन इंग्लिश मेडियम शाळेमधून सर्व शिक्षक, मुख्याध्यापक व संचालक,या शिबिरासाठी उपस्थित होते. शिबिराचे प्रबोधन रे. फा. जॉर्ज डी व अजय डीमोंटी यांनी प्रभावीपणे केले. या शिबिरासाठी प्रजा जागृती शिक्षण संस्थाचे महागुरुस्वामी रे. डॉ. बार्थोल बरेटो यांचे आशीर्वादाने व सचिव फा.डॉमनिक रोझारिओ, सहसचिव फा. फ्रान्सिस ओहोळ यांच्या नियोजनानुसार यशस्वी संपन्न झाले. त्यात नवनिर्वाचित मुख्याध्यापक व आजी माजी मुख्याध्यापक चंद्रकांत चित्ते व सचिन शिंगाडे,व संत तेरेजा शैक्षणिक संकुलाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी परिश्रम घेतले.

# शिराळ ग्रामपंचायतीकडून गुणवंतांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून शिराळ ग्रामपंचायतीच्यावतीने गावातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच सेवानिवृत्त शिक्षकांचा व नव्याने रुजू झालेल्या मुख्याध्यापकांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाने गावातील शिक्षण क्षेत्रात प्रेरणादायी पाऊल उचलले गेले. मार्च २०२५ मध्ये पार पडलेल्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावीच्या परीक्षांचा निकाल नुकताच जाहीर झाला. या परीक्षेमध्ये यशवंत विद्यालय, शिराळ येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले.

समीक्षा सतीश गायकवाड हिने ८६.८०% गुण मिळवत प्रथम क्रमांक, दुर्गेश अनिल झाडे याने ८४.६०% गुणांसह द्वितीय क्रमांक व ऐश्वर्या राजेंद्र गोरे हिने ७७.६०% गुणांसह तृतीय क्रमांक पटकावला. या गुणवंत विद्यार्थ्यांचा शिराळ ग्रामपंचायतीच्या वतीने सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आणि इतर विद्यार्थ्यांसाठी हे एक प्रेरणास्त्रोत ठरेल, असे मत व्यक्त करण्यात आले.




### कार्यक्रमास या मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमाला सरपंच रवींद्र मुळे, माजी उपसरपंच उमा आसाराम आव्हाड, शिक्षक आसाराम आव्हाड, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक मुळे, तसेच प्रकाश तुपे, अमोल वाघ, मंगेश गोरे, पोपट आव्हाड, रवींद्र घोरपडे, काकासाहेब साबळे, संतोष घोरपडे, आणि गुणवंत विद्यार्थ्यांचे पालक सतिष गायकवाड, अनिल झाडे, राजेंद्र गोरे उपस्थित होते.

# तंत्रज्ञानाच्या आधारावरच शेतीचा उज्वल मार्ग

## पंजाबराव डक यांचे शेतकऱ्यांना मार्गदर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** माहिती तंत्रज्ञानाच्या आधारे पीक पद्धती आणि दैनंदिन हवामानाचे भान ठेवून शेती केल्यास शेतकऱ्यांचे भविष्य नक्कीच उज्वल होईल, असे स्पष्ट मत प्रसिद्ध हवामान तज्ञ पंजाब डक यांनी व्यक्त केले. पाथर्डी येथील श्री विश्वविनायक मल्टिस्टेटच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित शेतकरी संवाद मेळाव्यात ते शेतकऱ्यांना मार्गदर्शन करत होते.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष मोदक शहाणे, माजी नगरसेवक बंडू पाटील बोरुडे, दिलीप भांडकर, अनिल उदावंत, सुनिल शहाणे, अ‍ॅड. हरिहर गर्जे, भगवान साठे, मंगल कोकाटे, मधुकर शहाणे, बाळासाहेब डोंगरे, बाळासाहेब जिरेसाळ, संजय दराडे, परमेश्वर टकले, प्रकाश बोरुडे, शिवाजी मरकड, विठ्ठल बडे, शंकर हाडके, अण्णासाहेब आंधळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.




डख म्हणाले, ''नवीन साधनसामग्री आणि माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीत बदल घडवता येतो. शेतीच्या उत्पादन क्षमतेत वाढ करण्यासाठी कृषी विद्यापीठांना भेट देऊन तिथले आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे काळाची गरज आहे.शेती ही आता जागतिक व्यापाराचा भाग बनली आहे. त्यामुळे घेतल्या जाणाऱ्या पिकांची गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची ठरते.


पिकांचे नियोजन करताना हवामानाच्या अंदाजावर लक्ष ठेवून मशागत करणे आवश्यक आहे, यामुळे उत्पादन खर्चात बचत करता येते.पर्यावरण रक्षणाचे महत्त्व अधोरेखित करत ते म्हणाले, झाडेच आपल्याला संतुलित पाऊस देतात, त्यामुळे अधिकाधिक झाडे लावावीत.

# 'त्या' तिघा निष्ठावंतांचा निर्णय मंत्री शिंदेकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** भाजपचे जिल्हा व तालुकास्तरावर पदाधिकारी म्हणून पंधरा वर्षांपासून निष्ठावंत राहिलेले काही कार्यकर्ते यावेळी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी प्रबळ दावेदार आहेत. यामध्ये भाजपचे जिल्हा चिटणीस अजिनाथ हजारे, जिल्हा सरचिटणीस लहु शिंदे, माजी तालुकाध्यक्ष अजयदादा काशीद हे तीघेही विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे विश्वासू कार्यकर्ते म्हणून ओळखले जातात. शिंदेंचा निर्णय या तिघांसाठीही अंतिम असणार आहे.

जिल्हा चिटणीस आजिनाथ हजारे सेवानिवृत्त शिक्षक ते यशस्वी उद्योजक असा प्रवास सामाजिक कार्यात आघाडीवरचे नाव २००७ पासून विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या सोबत भाजपात सक्रिय झाले. शिंदेंच्या माध्यमातून त्यांना पक्ष संघटनेत निरनिराळ्या पदावर स्थानही मिळाले. ५ सप्टेंबर २००० ला त्यांनी निवडक सहकार्यांना बरोबर घेऊन ज्योती क्रांती पतसंस्थेच्या माध्यमातून जवळा येथे रोपटे लावले आणि ग्रामीण भागात गरजवंतांचा



आर्थिक कणा बणण्याचे काम केले, पुढे ज्योती क्रांती चे मल्टीस्टेट मध्ये रुपांतर झाले.

पाच राज्यांचे कार्यक्षेत्र पादाक्रांत करुन ४८ शाखा त्यांनी उभारल्या. संस्थेचा वटवृक्ष निर्माण केला. आज संस्थेत ३०० कर्मचारी, २०० दैनंदिन संकलनप्रतिनिधी आहेत. पाचशे कुटुंबाला रोजगार दिला. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक गुजरात आंध्रप्रदेश. या पाच राज्यांचे

### जिल्हा परिषद निवडणुकीसाठी आहेत दावेदार

कार्यक्षेत्र ३० ग्राहक सेवा केंद्र ५०० महिला बचत गट ५०००० महिलांना रोजगार दिला.

जिल्हा सरचिटणीस लहु शिंदे तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाची समजली जाणारी आरणगाव ग्रामपंचायत, सलग तीन पंचवार्षिक ताब्यात ठेवणारा युवा नेता, ग्रामविकासाची गंगा त्यांनी या परिसरात उभी केली. जलसंधारणाच्या क्षेत्रात लक्षवेधी काम केले.

# डॉ. संजय घोगरे यांचा सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. संजय घोगरे यांनी पुन्हा पदभार घेतल्याबद्दल प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. तर दिव्यांगांना सहकार्य करुन त्यांचे विविध प्रश्न सोडविण्याची मागणी यावेळी करण्यात आली. याप्रसंगी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष अ‍ॅड. लक्ष्मण पोकळे, विजय हजारे, राजेंद्र पोकळे, गीतांजली कासार, वसंत शिंदे आदी उपस्थित होते.

# कवळे यांना उपसचिवपदी पदोन्नती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** जिल्ह्याचे सुपुत्र आणि नागलवाडी येथील रहिवासी आबासाहेब आत्माराम कवळे यांची महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागात उपसचिवपदी नुकतीच पदोन्नती झाली आहे.

सध्या मुंबई येथे मंत्रालयातील सामान्य प्रशासन विभागात अवर सचिव पदावर कार्यरत होते. सुवर्ण जयंती राजस्व अभियानाची आखणी व अंमलबजावणी यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा राहिला आहे. विशेषतः भारत निवडणूक आयोगाकडून दिलेल्या जबाबदारीत त्यांनी ईव्हीएम-व्हीव्हीपॅट यंत्रांकरिता महाराष्ट्राचे समन्वय अधिकारी म्हणून जवळपास ५ वर्षे कामगिरी केली. त्यांनी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये निवडणूक यंत्रांचे सुरक्षित साठवणगृह उभारण्यापासून ते आयोगाच्या कार्यपद्धतीनुसार अन्य राज्यांत पर्यवेक्षण करण्यापर्यंतची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्ष अधिकारी पदावर काम करण्यापूर्वी कवळे यांनी पोलीस उपनिरीक्षक म्हणून मुंबई पोलीस दलात महत्त्वाच्या विभागांमध्ये सेवा बजावली आहे.

# हिवरेबाजारचे प्रयोग नेहमी ठरतात प्रेरणादायी

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया : राबविलेल्या विविध उपक्रमांचे केले कौतुक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** हिवरेबाजार ग्रामस्थांनी श्रमदान व एकजुटीतून राबविलेले विकासात्मक प्रयोग प्रशासनासाठी प्रेरणादायी आहेत, अशा शब्दात जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी हिवरे बाजार येथे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे कौतूक केले.

पर्यावरण संवर्धनांतर्गत एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी या संकल्पनेतून हिवरेबाजार येथील मातृस्मृती वनमंदिर परिसरात विविध ऐतिहासिक आणि सांस्कृतिक घटनांचे औचित्य साधून एकूण १८०० देशी वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा प्रारंभ जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या हस्ते झाला. यावेळी पद्मश्री पोपटराव पवार उपस्थित होते. त्यांनी हिवरे बाजार येथे राबविलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. मसुरीतील लालबहादूर शास्त्री प्रशासन अकादमीत प्रशिक्षण घेताना त्यांनी हिवरेबाजारमधील कार्याची सादरीकरणासह माहिती दिली होती, याची आठवण यावेळी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितली.



या उपक्रमामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७२५ वा संजीवन समाधी सोहळा, संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ वा वैकुंठगमन दिन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा त्रिशताब्दी जन्मोत्सव आणि प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सव अशी एकत्रित बेरीज करून एक हजार ८०० झाडे लावण्याचा आणि त्याच्या संवर्धनाचा निर्णय घेण्यात आला. याच पार्श्वभूमीवर शालेय रानमेवा अभियान ही संकल्पना राबवण्यात आली. हिवरेबाजार ग्रामस्थांच्या वतीने जिल्हाधिकारी डॉ. आशिया सन्मान करण्यात आला. या वेळी सरपंच विमलताई ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे, व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, दूध संस्थेचे चेअरमन बाबासाहेब गुंजाळ, हरिभाऊ ठाणगे, एस.टी. पादीर, रो. ना. पादीर, मंडळ अधिकारी प्रताप कळसे, तलाठी संतोष पाखरे आदी उपस्थित होते.

### प्रत्यक्ष काम पाहणे जास्त आनंददायी

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, की आपण लोकसेवा आयोगाचा अभ्यास करत असताना पद्मश्री पोपटराव पवार यांचे कार्य पाहिले होते. आज प्रत्यक्ष हिवरेबाजारला भेट देऊन ते कार्य पाहता आले, हा माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा क्षण आहे. गावातील प्रत्येक नागरिकाने एकत्रितपणे आरोग्य, शिक्षण, कृषी, जलसंधारण क्षेत्रात जे योगदान दिले आहे, त्यातून हिवरेबाजारचा समावेशक आणि शाश्वत विकास घडला आहे. हेच यशाचे खरे सूत्र आहे.

# संपादकीय

## सक्षमतेचा साक्षीदार

'ऑपरेशन सिंदूर' मध्ये पाकिस्तानच्या दहशतवाद्यांचे नऊ तळ उद्ध्वस्त करण्यात आले. त्याचबरोबर 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळी चीनी क्षेपणास्त्रे आणि अन्य युद्धसामुग्रीचे पितळ भारतापुढे उघडे पडल्यामुळे चिनाब पुलाच्या उद्घाटनाची घोषणा ही पाकिस्तानच्या अजेंड्याच्या अपयशाची घोषणा आहे आणि म्हणूनच पंतप्रधान पुलावर तिरंगा फडकावत होते, तेव्हा पाकिस्तानने पोसलेली 'पासबान-ए-हुर्रियत' नावाची फुटीरतावादी संघटना पंतप्रधान मोदींच्या जम्मू काश्मीर भेटीचा निषेध करत होती. काश्मीरमध्ये रेल्वे आणण्याची कल्पना एक शतकाहून अधिक जुनी आहे; परंतु ती २००२ मध्ये गांभीर्याने घेण्यात आली आणि तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ती राष्ट्रीय प्रकल्प म्हणून घोषित केली. तीही पाकिस्तानच्या कृतींना उत्तर देण्यासाठी; कारण १९९९ मध्ये कारगिल युद्धादरम्यान काश्मीर खोऱ्यासाठी रेल्वेजोडणीची तीव्र गरज भासली होती. काश्मीरमध्ये रेल्वे आणण्याच्या मार्गातील सर्वात मोठा अडथळा म्हणजे चिनाब नदी आणि तो ओलांडण्यासाठी रियासी जिल्ह्यातील कौडी आणि बक्कलदरम्यान चिनाब नदीवर जगातील सर्वात उंच रेल्वे पूल बांधण्यात आला. या पुलाच्या उद्घाटनाचा काही वेगळ्या अंगांनीही विचार करण्याची गरज आहे. हा महत्त्वाकांक्षी भारतीय रेल्वे प्रकल्प चीन आणि पाकिस्तान या दोन्ही देशांसाठी मोठा धक्का आहे. चिनाब पूल पूर्ण झाल्यामुळे पीर पंजाल प्रदेशातील दुर्गम भागात सामान्य लोक आणि सुरक्षा दलांची ये-जा वाढेल. त्यामुळे या भागातील दहशतवादी आणि फुटीरतावादी परिसंस्थेचे नुकसान होईल. आता, अखंड रेल्वे कनेक्टिव्हिटीमुळे, सुरक्षा दलांची हालचाल आणि त्यांच्या उपकरणांचा पुरवठा केवळ काश्मीर खोऱ्यात नियंत्रण रेषेपर्यंतच नाही, तर लडाख प्रांतातदेखील होईल. भविष्यात हा रेल्वे प्रकल्प कारगिलमार्गे लेहला जाईल, असा विश्वास आहे. याशिवाय, हिमाचलमधून लडाखसाठी रेल्वे मार्ग टाकण्याच्या योजनेवरही काम सुरू आहे. त्यामुळे चीनची चिंता वाढली आहे. या प्रकल्पाने रेल्वेच्या पायाभूत सुविधा निर्माण करण्याबाबतीत भारताला जगातील आघाडीच्या देशांमध्ये स्थान दिले आहे. ते एक प्रकारे आशियातील चीनच्या वर्चस्वासाठीही आव्हान आहे. हा पूल भारताच्या लवचिकतेचे, विकासाचे आणि सक्षमीकरणाचे प्रतीक आहे. या प्रकल्पामुळे काश्मीर खोरे आणि जम्मूतील दुर्गम भागात विकास आणि पर्यटनाला चालना मिळेल. स्थानिक तरुणांसाठी रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि ते पाकिस्तानी जिहादी अजेंड्यापासून दूर राहतील.

हा प्रकल्प काश्मीरचे भारताशी एकीकरण मजबूत करतो, काश्मीरमधील फुटीरतावाद आणि दहशतवादाचा अजेंडा हाणून पाडतो. म्हणूनच पंतप्रधान चिनाब पुलावर तिरंगा फडकावत होते, तेव्हा ते पाकिस्तानला त्याच्या अपयशाची आठवण करून देत होते आणि चांगला शेजारी म्हणून वागण्याचे आणि भारताशी सौहार्दपूर्ण संबंध निर्माण करण्याचे आणि गरिबी आणि मागासलेपणातून बाहेर पडण्याचे आवाहन करत होते. या पुलाच्या बांधकामामुळे दोन देशांची झोप उडाली आहे. चिनाब पूल भारतीय सैन्याला जम्मू-काश्मीर आणि लडाखमध्ये सैन्य, शस्त्रे आणि रसद जलद गतीने वाहून नेण्यास मदत करेल. यामुळे विशेषतः पाकिस्तानला लागून असलेल्या नियंत्रण रेषा आणि लडाखमध्ये भारताची स्थिती मजबूत होईल. हा पूल पाकव्याप्त काश्मीरच्या जवळ आहे. तिथे पाकिस्तान आणि चीन संयुक्तपणे 'चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर' (सीपीईसी) राबवत आहेत. भारताची या भागातील मजबूत उपस्थिती या प्रकल्पांवर परिणाम करू शकते. २०२२ मध्ये पाकव्याप्त काश्मीरमधील एक 'सीपीईसी' पूल हिमनदी फुटल्याने वाहून गेला होता. त्यामुळे पाकिस्तानचे आधीच नुकसान झाले आहे. बागलिहार आणि सलालसारखी चिनाब नदीवरील भारताची धरणे आधीच पाकिस्तानसाठी चिंतेचे कारण ठरत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने अलीकडेच सिंधू पाणी करार स्थगित केला आहे. त्यानंतर परिस्थिती आणखी बिकट होऊ शकते. चिनाब पूल या प्रदेशात भारताची पकड मजबूत करेल. त्यामुळे पाकिस्तानच्या पाणी आणि वीज योजनांवर परिणाम होऊ शकतो. या पुलामुळे काश्मीरमध्ये सैन्यदलाचा संपर्क वाढेल. त्यामुळे दहशतवादाला आळा घालण्यास मदत होईल. पाकिस्तानसाठी ही चिंतेची बाब आहे, कारण तो अनेकदा काश्मीरमध्ये अशांतता निर्माण करण्यासाठी प्रत्येक शक्य मार्गाचा प्रयत्न करतो. दरम्यान, चीनच्या अस्वस्थतेमागेही अनेक मोठी कारणे आहेत. 'सीपीईसी' हा चीनचा ६२ अब्ज डॉलरचा प्रकल्प आहे. तो पाकव्याप्त काश्मीर आणि गिलगिट-बाल्टिस्तानमधून जातो. चिनाब पूल भारताची लष्करी आणि पायाभूत सुविधांची ताकद वाढवेल. ते 'सीपीईसी'साठी एक आव्हान आहे. 'सीपीईसी'ला अगोदरच बलुची बंडखोरांचा विरोध आहे. चीनने पाकव्याप्त काश्मीरमधील डायमिर-भाशा आणि मोहंमद धरण यासारख्या प्रकल्पांमध्ये मोठी गुंतवणूक केली आहे. भारताने यावर आक्षेप घेतला आहे, कारण ते त्याच्या भूभागावर बेकायदेशीर कब्जा करून बांधले जात आहेत. चिनाब पुलामुळे चीनच्या योजनांवर परिणाम होऊ शकतो. चिनाब पूल भारताला हिंद महासागर आणि दक्षिण आशियामध्ये एक मजबूत स्थान मिळवून देईल. चीन भविष्यातील नौदल तळ म्हणून ग्वादर बंदर विकसित करू इच्छित आहे; परंतु भारताची वाढती ताकद ते कठीण करू शकते. २०२० च्या गलवान संघर्षानंतर भारत आणि चीनमध्ये तणाव निर्माण झाला आहे. चिनाब पूल लडाखमध्ये भारताच्या लष्करी तयारीला गती देईल. तो चीनसाठी एक धोरणात्मक तोटा आहे.

# अमेरिकेचे झूट, गुंतवणूकदारांची घट्ट मूठ

**अर्थनगरीतून**

**– महेश देशपांडे**
**आर्थिक घडामोडींचे जाणकार**



सरत्या आठवड्यामध्ये अमेरिकेचे व्यापार पुराण सुरुच राहिले. मात्र काही उदाहरणे आणि दाव्यांनिशी भारत-अमेरिका व्यापारात अमेरिकेचा तोटा नाही, हे समोर आले. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचा भारतावर पुन्हा विश्वास बसत असल्याचे आकडेवारीवरुन दिसून आले. याच सुमारास धारावी प्रकल्पांतर्गत आधुनिक एकात्मिक वाहतूक केंद्र उभारण्याची लक्षवेधी योजना समोर आली.

सरत्या आठवड्यामध्ये अमेरिका पुराण सुरुच राहिले. मात्र काही उदाहरणे आणि दाव्यांनिशी भारत-अमेरिका व्यापारात अमेरिकेचा तोटा नाही, हे सिध्द करण्यात आले. त्यातून ट्रम्प यांचा दावा अर्धवट तथ्यांवर आधारित असल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, परदेशी गुंतवणूकदारांचा भारतावर पुन्हा विश्वास बसत असल्याचे आकडेवारीवरुन दिसून आले. याच सुमारास धारावी प्रकल्पांतर्गत आधुनिक एकात्मिक वाहतूक केंद्र उभारण्याची लक्षवेधी योजना समोर आली.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी वारंवार व्यापारतुटीचा मुद्दा उपस्थित करत भारत 'टॅरिफ किंग' असल्याचा आरोप केला. ते अमेरिकेतून होणाऱ्या आयातीवरील कर कमी करण्यासाठी भारतावर दबाव आणत आहेत; परंतु व्यापार तूट असल्याचा त्यांचा दावा अर्धवट तथ्यांवर आधारित असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे. 'थिंक टँक ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह'नुसार शिक्षण, डिजिटल सेवा, आर्थिक ऑपरेशन्स आणि बौद्धिक संपदा रॉयल्टी इत्यादींमधून अमेरिकेला दर वर्षी ८० ते ८५ अब्ज डॉलर्स मिळतात. हे आकडे समाविष्ट केल्यास अमेरिकेचा भारतासोबतचा व्यापार तुटीमध्ये नाही, तर ३५ ते ४० अब्ज डॉलर्सच्या अधिशेषात आहे. १३ फेब्रुवारी २०२५ रोजी ट्रम्प यांनी दावा केला होता की अमेरिकेची भारतासोबतची व्यापार तूट शंभर अब्ज डॉलर्स आहे. हा आकडा चुकीचा होता. भारत सरकारच्या आकडेवारीनुसार २०२४-२५ मध्ये दोन्ही देशांदरम्यान १८६ अब्ज डॉलर्सचा व्यापार झाला होता. भारताने अमेरिकेला ८६.५ अब्ज डॉलर्सच्या वस्तू निर्यात केल्या आणि अमेरिकेतून ४५.३ अब्ज डॉलर्सच्या वस्तू आयात केल्या. अशा प्रकारे, भारताकडे वस्तू निर्यातीत ४१ अब्ज डॉलर्सचा अधिशेष होता. सेवांच्या बाबतीत भारताने २८.७ अब्ज डॉलर्सच्या वस्तू निर्यात केल्या तर २५.५ अब्ज डॉलर्सची आयात केली. यामध्ये, भारताकडे ३.२ अब्ज डॉलर्सचा अधिशेष होता. अशा प्रकारे, भारताच्या बाजूने एकूण अधिशेष ४४.४ अब्ज डॉलर्स आहे. हे व्यवसाय आकडेवारीत समाविष्ट नाहीत.

या आकडेवारीत अनेक महत्त्वाचे व्यवसाय समाविष्ट नाहीत. उच्च शिक्षण क्षेत्रात अमेरिकेला भारताकडून भरपूर महसूल मिळतो. अमेरिकेत शिक्षण घेणारे भारतीय विद्यार्थी दर वर्षी सुमारे २५ अब्ज डॉलर्स खर्च करतात. शिक्षण शुल्काच्या स्वरूपात १५ अब्ज डॉलर्स तर उर्वरित दहा अब्ज डॉलर्स तेथे राहण्यासाठी खर्च केले जातात. भारतीय विद्यार्थ्यांचा वार्षिक खर्च ८७,००० ते एक लाख ४२ हजार डॉलर्सपर्यंत असतो. अशा प्रकारे शिक्षण ही अमेरिकेतून भारतात होणाऱ्या सर्वात मोठ्या निर्यातींपैकी एक आहे. गुगल, मेटा, अमेझॉन, ॲपल आणि मायक्रोसॉफ्टसारख्या अमेरिकन दिग्गज कंपन्या दर वर्षी भारताच्या डिजिटल बाजारपेठेतून १५ ते २० अब्ज डॉलर्स कमावतात. हे उत्पन्न डिजिटल जाहिराती, क्लाउड सेवा, ॲप स्टोअर्स, सॉफ्टवेअर आणि डिव्हाइस विक्री आणि स्ट्रीमिंग सबस्क्रिप्शनमधून येते. त्यातील मोठा भाग अमेरिकेत परत जातो. सिटी बँक, जेपी मॉर्गन, गोल्डमन सॅक्स, मॅकेन्झी, बीसीजी, डेलॉइट, पीडब्ल्यूसी आणि केपीएमजीसारख्या अमेरिकन बँका आणि सल्लागार कंपन्या दर वर्षी भारतातून १० ते १५ अब्ज डॉलर्स कमावतात. अमेरिकेसाठी उत्पन्नाचा आणखी एक मोठा स्रोत म्हणजे ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर (जीसीसी). वॉलमार्ट, डेल, आयबीएम, वेल्स फार्गो, सिस्को आणि मॉर्गन स्टॅनलीसारख्या कंपन्या बंगळुरू आणि हैदराबादमध्ये ग्लोबल कॅपॅबिलिटी सेंटर चालवत आहेत. त्यांचे बहुतेक काम भारतात केले जाते; परंतु त्यांचे आर्थिक मूल्य अमेरिकेत जाते; जे दर वर्षी १५ ते २० अब्ज डॉलर्स आहे.

फायझर, जॉन्सन अँड जॉन्सन, मर्क यासारख्या अमेरिकन औषध कंपन्या दर वर्षी पेटंट, औषध परवाना आणि तंत्रज्ञान हस्तांतरणातून दीड ते दोन अब्ज डॉलर्स कमावतात. फोर्ड आणि जीएमसारख्या ऑटोमोबाईल कंपन्या आणि घटक पुरवठादार परवाना आणि तांत्रिक सेवांमधून ०.८ ते १.२ अब्ज डॉलर्स कमावतात. हॉलिवूड आणि अमेरिकन स्ट्रीमिंग प्लॅटफॉर्म भारतात बॉक्स ऑफिस, सबस्क्रिप्शन आणि कंटेंट परवाना यातून दर वर्षी १ ते १.५ अब्ज डॉलर्स कमावतात. अमेरिका संरक्षण क्षेत्रातही भारताला अब्जावधी डॉलर्सची विक्री करते. त्याचे आकडे अनेकदा गोपनीय असतात. 'जीटीआरआय ग्लोबल ट्रेड रिसर्च इनिशिएटिव्ह'चे संस्थापक अजय श्रीवास्तव म्हणतात की भारताने अमेरिकेसोबत मुक्त व्यापार कराराच्या चर्चेत पूर्ण आत्मविश्वासाने जावे आणि अमेरिकेने केलेल्या तोट्याच्या अतिरंजित दाव्याला विरोध करावा. अमेरिका अजूनही व्यापार तुटीवर लक्ष केंद्रित करत असल्यास भारतानेही बोलणी शुल्कापुरती मर्यादित ठेवावीत. सरकारी खरेदी, डिजिटल व्यापार, बौद्धिक संपदा आणि इतर बाबींमध्ये वाटाघाटी नाकाराव्यात. श्रीवास्तव यांच्या मते व्यापार संतुलनाशी काहीही संबंध नसलेल्या क्षेत्रांमध्ये अमेरिकेला मोठ्या सवलती देण्यात काही अर्थ नाही कारण यामुळे अमेरिकेचा व्यापार अधिशेष आणखी वाढेल.

दरम्यान, ताज्या आकडेवारीनुसार, भारतीय शेअर बाजारातील परदेशी गुंतवणूकदारांचा विश्वास सतत वाढत आहे. मे २०२५ मध्ये परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी (एफपीआय) १९,८६० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. 'डिपॉझिटरी डेटा'नुसार जागतिक आर्थिक निर्देशक आणि मजबूत देशांतर्गत आर्थिक परिस्थितीमुळे ही गुंतवणूक करण्यात आली. तथापि, जानेवारीमध्ये ७८,०२७ कोटी रुपये, फेब्रुवारीमध्ये ३४,५७४ कोटी रुपये आणि मार्चमध्ये ३,९७३ कोटी रुपये काढले गेले आहेत. तज्ज्ञांचा विश्वास आहे की भारतातील गुंतवणुकीचा हा ट्रेंड पुढेही सुरू राहू शकतो. तथापि, 'जिओजित इन्व्हेस्टमेंट्स'चे मुख्य गुंतवणूक धोरणकार व्ही. के. विजयकुमार यांनी इशारा दिला की शेअर बाजारातील मूल्यांकने महाग होत आहेत. परदेशी गुंतवणूकदार शेअरच्या किमती वाढतील तेव्हा विक्री करू शकतात.

'मॉर्निंगस्टार इन्व्हेस्टमेंट'चे सहसंचालक हिमांशू श्रीवास्तव म्हणाले की मे महिन्यात गुंतवणुकीसाठी अनेक घटक जबाबदार होते. अमेरिकेत कमी महागाईची अपेक्षा आणि 'फेडरल रिझर्व्ह'ने व्याजदरात कपात केल्याने भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठा आकर्षक झाल्या. त्याच वेळी, भारताची मजबूत जीडीपी वाढ, कंपन्यांची चांगली कमाई आणि धोरणात्मक सुधारणांमुळे गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढला. विजयकुमार म्हणाले की डॉलरच्या किमतीत घट, अमेरिका आणि चीनच्या अर्थव्यवस्थांमध्ये मंदी, भारताची जलद जीडीपी वाढ आणि कमी महागाई तसेच व्याजदर यामुळे गुंतवणुकीला चालना मिळत आहे. मे महिन्यामध्ये 'एफपीआय'नी ऑटो, ऑटो पार्टस, टेलिकॉम आणि वित्तीय क्षेत्रात खरेदी केली. स्टॉकव्यतिरिक्त, परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांनी डेट जनरल लिमिटमध्ये १९,६१५ कोटी रुपये आणि डेट व्हॉलंटरी रिटेन्शनमध्ये १,८९९ कोटी रुपये गुंतवले. गुंतवणूकदारांची ही क्रिया एप्रिलच्या मध्यापासून सुरू झाली आणि मे महिन्यातही सुरू राहिली. भारतातील आर्थिक स्थैर्य आणि जागतिक बाजारपेठेतील अनुकूल वातावरण गुंतवणूकदारांना आकर्षित करत असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. तथापि, बाजाराचे उच्च मूल्यांकन पाहता सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे.

आता एक वेगळी बातमी. अदानी समूहाने मुंबईतील धारावी पुनर्विकास प्रकल्पांतर्गत आधुनिक वाहतूक केंद्र बांधण्याची योजना तयार केली आहे. या योजनेंतर्गत रेल्वे, रस्ते आणि विमानतळाशी संबंधित सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध असतील. या प्रकल्पासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'नवभारत मेगा डेव्हलपर्स प्रायव्हेट लिमिटेड'च्या निवेदनामध्ये म्हटले आहे की या केंद्रात मुंबई आणि नवी मुंबई विमानतळांसाठी विशेष गाड्या, चेक-इन आणि ट्रांझिट सुविधादेखील असतील. या कंपनीमध्ये अदानी समूहाचा ८० टक्के हिस्सा आहे तर उर्वरित २० टक्के हिस्सा महाराष्ट्र सरकारकडे आहे. या मल्टीमोडल ट्रांझिट हबमध्ये रेल्वे, मेट्रो सेवा आणि शहरात येणाऱ्या आणि जाणाऱ्या शहर बसेसचा समावेश असेल. धारावी आणि आसपासच्या भागात वाहतूक सुलभ आणि जलद करण्याचा सरकारचा उद्देश आहे. अदानी समूहाद्वारे संचालित मुंबई आणि नवी मुंबई विमानतळ या वाहतूक केंद्राशी जोडले जातील. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये महाराष्ट्र सरकारने धारावीच्या पुनर्विकासासाठी मुंबईच्या ईशान्येकडील २५६ एकर मिठागर जमीन संपादित करण्यास मान्यता दिली. या आठवड्यात राज्य सरकारने धारावीच्या मास्टर प्लॅनलाही हिरवा कंदील दाखवला. आशियातील सर्वात मोठ्या झोपडपट्टी क्षेत्रांपैकी एक असलेल्या धारावीला आधुनिक आणि सोयीस्कर क्षेत्रात रूपांतरित करण्याचे या प्रकल्पाचे उद्दिष्ट आहे.

# वटपौर्णिमा हि महिलांसाठी सौभाग्यदर्शनाची सप्तपदी

## प्राचार्या डॉ. कुंदा कवडे; अळकुटी महाविद्यालयात वटपौर्णिमानिमित्त वटवृक्षाचे रोपण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : सावित्रीने आपला पती सत्यवानाचे प्राण यमाकडून परत आणले होते. तो दिवस होता. ज्येष्ठ मासातील पौर्णिमेचा, त्यामुळे या दिवशी वटपौर्णिमेचा सण साजरा केला जातो. विवाहित महिला आपल्या पतीच्या दीर्घायुष्यासाठी वटपौर्णिमेच्या दिवशी वडाच्या झाडाची पूजा करतात आणि निर्जल व्रत ठेवतात. म्हणूनच वटपौर्णिमा सण महिलांसाठी सौभाग्यदर्शनाची सप्तपदीच आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. कुंदा कवडे यांनी केले.

पद्मभूषण लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे अळकुटी महाविद्यालयात वटपौर्णिमेचे औचित्य साधून सर्व महिला भगिनींनी वटवृक्षाचे पूजन केले व महाविद्यालय परिसरात वटवृक्षारोपण केले व पर्यावरण संवर्धनाची शपथ घेतली.

> महिला भगिनींनी आजच्या आधुनिक युगात होत असलेल्या विकासकामांमुळे नवनवीन इमारती, रस्ते निर्माण होतात. परंतु त्याचबरोबरीने वृक्षतोडही मोठ्या प्रमाणावर होत आहे. त्याचा दुष्परिणाम म्हणून कोरोना काळात ऑक्सिजनची कमतरता भासली आहे. आपणच महिला भगिनींनी अशा पवित्र सणाच्या दिवशी, असे ऑक्सिजनपूरक वृक्षांची लागवड केली पाहिजे.
>
> **– डॉ. कुंदा कवडे, प्राचार्या**



यावेळी प्रा. सुनिता जाधव, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, प्रा. स्वाती फापाळे, प्रा. पूजा वैरागर, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. प्रियंका दिवटे, प्रा. अनुराधा गाढवे, सूर्यमाला भोर, सुनिता भालेराव, छाया म्हस्के, आणि प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी महिला भगिनी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. स्वाती फापाळे यांनी केले. तर आभार प्रा. सुनिता जाधव यांनी मानले.

# ... आता डिजीलॉकरमध्ये विजेची बिले उपलब्ध

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसेन्स, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला अशी महत्त्वाची कागदपत्रे इलेक्ट्रॉनिक स्वरुपात सुरक्षित ठेऊन हवे. तेव्हा उपलब्ध करून देणाऱ्या केंद्र सरकारच्या डिजिलॉकर या ऑनलाईन सुविधेमध्ये आता महावितरणची वीजबिलेही उपलब्ध झाली असून वीज ग्राहकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून वीज ग्राहकांना ईज ऑफ लिव्हिंगच्या आधारे अधिकाधिक सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने केंद्र सरकारच्या डिजिलॉकरशी वीजबिले जोडली आहेत. यामुळे वीज ग्राहकांना आपल्या मोबाईल फोनमध्ये डिजिलॉकर ॲपमध्ये ठेवलेल्या महत्त्वाच्या दाखल्यांसोबतच वीजेची बिलेही उपलब्ध होणार आहेत. त्यांना वीजबिल भरण्यासाठी तसेच गरजेनुसार हे बिल कोणाला पाठविण्यासाठी किंवा त्याचा प्रिंट काढण्यासाठी याचा उपयोग होईल.

डिजिलॉकर हा केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने डिजिटल इंडिया कार्यक्रमाच्या अंतर्गत सुरू केलेला महत्त्वाचा उपक्रम आहे. त्याचा वापर करून नागरिकांना आपले पॅन कार्ड, वाहन नोंदणी कागदपत्रे, रेशन कार्ड, दहावी मार्कशीट, बारावी मार्कशीट, निवासाचा दाखला असे अनेक दस्तऐवज ॲपमध्ये सुरक्षित ठेवता येतात आणि गरजेनुसार त्यांचा वापर करता येतो.

> **विजेचे चालू महिन्याचे बिल उपलब्ध**
>
> महावितरणने आपल्या संगणकीय व्यवस्थेतील बिलांची माहिती डिजिलॉकर सुविधेला उपलब्ध करून दिली आहे. वीज ग्राहकाने आपल्या डिजिलॉकर ॲपमध्ये गेल्यानंतर महावितरण वीज कंपनीची निवड करून आपला वीज ग्राहक क्रमांक दाखल करण्याची कृती एकदाच करायची आहे. त्यानंतर त्या ग्राहकाला आपल्या डिजिलॉकरमध्ये विजेचे चालू महिन्याचे बिल उपलब्ध होईल.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## कर्जत क्रीडा संकुलाचा निर्णय घ्या : बावनकुळे

आहे. त्याअनुषंगाने अतिरिक्त जागेची गरज लक्षात घेता बर्गेवाडी अथवा इतर पर्यायी दोन ते तीन ठिकाणांची मागणी तालुका क्रीडा संकुल समितीने करावी. यापूर्वी क्रीडा संकुलासाठी झालेल्या खर्चा संदर्भातील कार्यवाही देखील लेखी स्वरुपात विभागाकडून कळविण्यात यावी, असे निर्देश यावेळी देण्यात आलेले आहेत. या बैठकीस महसूल विभागाचे सह सचिव संजय बनकर, क्रीडा विभागाचे उप सचिव सुनिल पांढरे, सहसंचालक सुधीर मोरे, कर्जत नगरपालिकेचे मुख्य अधिकारी अक्षय जायभाये तसेच क्रीडा आयुक्त शितल उगले यांच्यासह कर्जत नगरपालिका नगराध्यक्षा रोहिणी घुले, उपनगराध्यक्ष संतोष मेहत्रे, राष्ट्रवादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके, सभापती काकासाहेब तापकीर, उपसभापती अभय पाटील, संचालक नंदकुमार नवले, सुनील शेलार, लालासाहेब शेळके, बजरंग कदम आदी उपस्थित होते.

## ...अखेर 'बापट'च्या संचालकांवर गुन्हा दाखल

मुदत ठेवीची मुदत पूर्ण झाल्यावर त्या पावतीचे युती नूतनीकरण करून पुन्हा पतसंस्थेत ठेवले. पण, त्यांना डिसेंबर २०२३ मध्ये पैश्यांची आर्थिक अडचण भासू लागल्याने त्यांनी अळकुटी शाखेत जाऊन पैसे मागितले असता, शाखा व्यवस्थापकाने त्यांना सध्या पैसे उपलब्ध नाहीत. थोडे दिवस थांबा, असे सांगितले. त्यामुळे त्यांनी पतसंस्थाच्या पारनेर येथील मुख्य कार्यालयात संपर्क साधून माहिती घेतली असता, त्यांना कोणीही माहिती दिली नाही, त्यामुळे त्यांचा संशय बळवला. तद्नंतर ठेवीदारांची जास्त ओरड झाल्याने मागील वर्षी च्या २०२४ मध्ये सेनापती बापट पतसंस्थेच्या संचालक मंडळानी चेअरमन रामदास भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली पारनेर येथील राळेगण सिद्धी मार्गावरील गणेश मंगल कार्यालयात सभासद व ठेवीदारांचा मेळावा घेतला व सर्वांना लवकरात लवकर ठेवींच्या प्रमाणात शेकडा २५ टक्के प्रमाणे ठेवीचे पैसे देण्याचे कबूल केले . मात्र संचालक मंडळाने दिलेल्या शब्द पाळला नाही. त्यानंतर अवघे शेकडा ५ टक्के रक्कम देण्याचे आश्वासन दिले. तर नंतर तोही शब्द पाळला नाही. फक्त २ टक्के रक्कम देण्यात आली. ही सर्व परिस्थिती असहय होऊन सुभाष आग्रे यांनी अखेर या वर्षीच्या दि. २१ एप्रिल रोजी पारनेर न्यायालयातील वकिलामार्फत पतसंस्थेला नोटीस पाठवून पैसे परत देण्याची मागणी केली. परंतु पतसंस्थे कडे पैसे उपलब्ध नसल्याने त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. यामुळे आग्रे यांनी पारनेर पोलीस ठाण्यात अखेर गुन्हा दाखल केला असून संस्थेचे चेअरमन रामदास भोसले, मुख्य कार्यकारी अधिकारी रामदास झंझाड, संचालक अण्णासाहेब औटी, ॲड. पंडित कोल्हे, संभाजीराव सोमवंशी, विलास बालवडकर, बाळासाहेब धोत्रे, बाबाजी तनपुरे, रमेश वाजे, संतोष चाहेर, अरुणा लाळगे, भास्कर जाधव, दत्तात्रय कुलट, किरण शिंदे यांनी संगममताने ठेवीदारांचे पैसे फसवणूक करून ठेवीदारांचे पैसे स्वार्थासाठी हडप केले. पतसंस्थेत ठेवीदारांच्या कोट्यावधी रुपयांच्या ठेवी अडकल्याने ठेवीदार हावालदिल झाले असून आमच्या घामाचे, कष्टाचे पैसे कोणी देता का? अशा आशेने पतसंस्थेचे मुख्य कार्यालय व सर्वच शाखांचे उंबरे झिजवत होते. अखेर ठेवीदार सुभाष आग्रे यांनी पुढाकार त्या संदर्भात पुढाकार घेत त्यांनी गुन्हा दाखल करून या विषयाला वाचा फोडल्याने पारनेर तालुक्यात चर्चेला पेव फुटले आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार देवकर यांनी फिर्याद दाखल करून घेतली असून पोलीस उपनिरीक्षक रणजित मारग हे करत आहे.

## नागरिकांनो, आपत्कालीन परिस्थितीत संपर्क साधा

अनेक ठिकाणी रात्रभर पडलेली झाडे, मोठ्या फांद्या हटवण्याचे काम सुरू होते.पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली आहे. गुरुवारी दिवसभर माहिती मिळेल, त्यानुसार पडलेली झाडे, रस्त्यांवरील फांद्या, पाला पाचोळा व इतर कचरा उचलण्याचे काम सुरू आहे. आपत्कालीन काळात उपाययोजना व मदतकार्यासाठी महानगरपालिकेची यंत्रणा सज्ज आहे. नागरिकांनी मदतीसाठी संबंधित प्रभाग अधिकारी, उद्यान विभाग किंवा अग्निशमन विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे.

## 'एअर इंडियाचे' विमान कोसळले

लंडनला जातं होतं आणि टेकऑफच्या वेळीच हे विमान कोसळल्याची माहिती समोर आली आहे. अपघातवेळी विमानात २४२ प्रवासी होते. जखमींना बाजूलाच असणाऱ्या सरकारी रुग्णालयात उपचारांसाठी तातडीने दाखल करण्यात आलं आहे. माजी मुख्यमंत्री विजय रूपाणी अपघातग्रस्त विमानाने प्रवास करीत देखील होते असे उघडकीस आले आहे. अपघातात काही प्रवासी भाजले गेल्याचंही समजत आहे. जखमींना बाजूलीच सरकारी रुग्णालयात तातडीने दाखल करण्यात आलं आहे. परिसरात प्रचंड धुराचे लोट पसरले आहे.

## मुख्यमंत्र्यांची बनावट सही

खोट्या स्वाक्षरीनिशी तयार करण्यात आले होते. मात्र, मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयातील अधिकृत प्रक्रियेनुसार अशा नियुक्त्यांसाठी विभागप्रमुख किंवा सचिव यांची स्वाक्षरी अनिवार्य असते, हे लक्षात आल्यावर युवतीला शंका आली. फसवणूक झालेल्या तरुणीचे नाव गीता कापडणे असून त्या चाळीसगाव तालुक्याच्या रहिवासी आहेत. गीता यांना देण्यात आलेल्या जॉइनिंग लेटरबाबत त्यांनी चौकशी केल्यानंतर सर्वेश भोसले याच्याकडे त्यांनी विचारणा केली. त्यावेळी सर्वेशने रणजीत मांडोळेच्या मदतीने इंटरनेटवर उपलब्ध असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या नाममुद्रासहित पत्रावर मजकूर टंकलिखित करून देवेंद्र फडणवीस यांची बनावट स्वाक्षरी वापरून जॉइनिंग लेटर तयार केल्याची कबुली दिली. या संपूर्ण फसवणूक प्रकरणात तिसरा संशयित तुषार उर्फ रोहित बेलदार याचा देखील समावेश आहे.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# संत निवृत्तीनाथ महाराज पालखी मार्गाची पाहणी

## आ. अमोल खताळ यांच्या सर्वच विभागाच्या अधिकाऱ्यांना सक्त सूचना



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : संत निवृतीनाथ महाराजांच्या पालखी मार्गाच्या कामाची तसेच प्रशासनाच्या वतीने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांची पाहाणी आमदार अमोल खताळ यांनी केली. या पालखीतील वारकरी बंधूआणि भगिनींची कोणतीही अडचण होणार नाही, याची सर्व विभागाच्या अधिकार्यानी काळजी घ्यावी आणि त्याबाबतचे सुयोग्य नियोजन करावे, अशा सक्त सूचना आ. अमोल खताळ यांनी दिल्या.

आषाढी वारीच्या निमिताने दरवर्षी संत निवृतीनाथ महाराज देवस्थानची पालखी पंढरपूरला जाताना तालुक्यातील पारेगाव बु ।। येथे मुक्कामाला थांबते. गेली अनेक वर्षाची ही परंपरा असून तालुक्यातील भाविकांच्या वतीने या पालखीचे मनोभावे स्वागत करण्यात येत असते. मागील वर्षी पावसाने वारकऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय झाली होती.त्यामुळे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संत निवृतीनाथ महाराजांच्या पालखी मार्ग कामाबाबत जिल्हाधिकारी तसेच अन्य विभागांच्या अधिकार्यांना गांभिर्याने नियोजन करून पालखी येण्यापुर्वीच सर्व व्यवस्था निर्माण करण्याबाबतच्या सूचना दिल्या होत्या.

> संगमनेर तालुक्यात संत निवृतीनाथ महाराज देवस्थानची पालखी संगमनेर तालुक्यात येणे हा अहील्यानगर जिल्ह्यासाठी मोठा अभिमान आहे. त्यामुळे या पालखीचे स्वागत चांगल्या पध्दतीने व्हावे म्हणून यंदा ग्रामस्थ आणि प्रशासनाच्या समन्वयातून चांगले नियोजन झाले आहे. पालखीच्या स्वागतासाठी पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी उपस्थित राहावे आशी विनंती केली असून जिल्ह्यातील सर्व वरीष्ठ अधिकारी वारकरी सांप्रदाया तील कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहाण्याचे आवाहन आ. अमोल खताळ यांनी केले आहे.

आमदार अमोल खताळ यांनी पारेगाव बु. येथे येवून ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामस्थ अधिकारी यांची एकत्रित बैठक घेवून तयारीचा आढावा घेतला. विशेष म्हणजे यंदा प्रथमच वारकर्यांसाठी तीन वॉटरफ्रूफ मंडपाची उभारणी करण्यात येणार असून यासाठी पालकमंत्री विखे पाटील यांच्या प्रयत्नामुळे महायुती सरकारने मंडपासाठी पाच लाख रूपये, २ लाख ग्रामपंचायती करीता अनुदान तसेच २५० शौचालय आणि स्नानगृहा करीता २०० युनिट उभारणीसाठी निधीची उपलब्धता करून देण्यात आली असल्याचे आ. खताळ यांनी सांगितले.

आरोग्य सेवेबाबत तात्पुरत्या स्वरुपातील दवाखाने सर्व यंत्रणांनी सज्ज ठेवावेत. पिण्याचे पाणी, तसेच वीज पुवरठा सुरळीत राहील, याची दक्षता घेण्याबाबत आ. खताळ यांनी सांगितले.

मंडप उभारण्यात येणाऱ्या जागांची तसेच पालखी मार्गावर झालेल्या कामाची माहीती आ. खताळ यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाचे अभियंता शाम मिसाळ यांच्याकडून जाणून घेतली. या रस्त्याच्या कामाकरीता मंत्री विखे पाटील यांनी निधी उपलब्ध करून दिल्यामुळे मार्गाचे काम होवू शकले. उरलेल्या दिवसात साईडपट्ट्यांची काम पूर्ण करण्याच्या सूचना आ. खताळ यांनी सार्वजनीक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी आमदार अमोल खताळ यांच्या समवेत तहसीलदार धीरज मांजरे, अतिरीक्त गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपकार्यकारी अभियंता शाम मिसाळ तालुका आरोग्य अधिकारी डॉ सुरेश घोलप,तालुक्याचे पोलिस निरीक्षक देविदास ढुमणे, निमोणचे सरपंच संदीप देशमुख ऍंड त्र्यंबक गडाख गणेश गडाख रावसाहेव गडाख लक्ष्मण गडाख सुरेश दळवी सुखदेव गडाख भीमराज गडाख नवनाथ गडाख निलेश गडाख कैलास गोर्डे सुनील वाकचौरे तळेगावचे प्रभारी सरपंच मयूर दिघे भाजप युवा नेते अमोल दिघे स भाजप महिला आघाडी तालुका अध्यक्ष कविता पाटील संपत फड अर्जुनशिरसाट डॉ स्वाती डांगे ग्रामसेवक गौरव कदम यांच्यासह पारेगाव ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते यांच्यासह अन्य विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# ई-केवायसी करीता संगणक संख्या वाढावा

## तहसीलदार यांना दिले लेखी निवेदन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी** : शेवगाव तहसील कार्यालयात संजय गांधी व श्रावणबाळ योजनेतील लाभार्थी यांना अनुदान मिळणेकरीता दिव्यांग, वृद्ध, विधवा महिलांना आपले सर्व मोलमजुरीचे कामे सोडून ई. के.वाय. सी. करणे करीता दिवसभर ताटकळत उभे राहावे लागत असल्याने दिव्यांग, वृद्ध, विधवा महिलांना मनस्थाप होत आहे.

संजय गांधी विभागात दोनच संगणक असल्याने ई. के. वाय. सीसाठी लांबलचक रांगा होत आहेत. मनुष्यबळ कर्मचारी देखील संजय गांधी विभागात उपलब्ध आहेत. परंतु संगणक नसल्याने कर्मचारी ई. के. वाय. सी. चे काम करू शकत नाही. या गोष्टीचा गांभीर्याने विचार करून संगणक संख्या वाढवण्यासाठी तहसीलदार शेवगाव यांच्याकडे सावली दिव्यांग संस्थेचे उपाध्यक्ष चांद शेख यांनी निवेदनद्वारे मागणी केली आहे. सदर निवेदन नायब तहसीलदार गौरी कट्टे यांनी स्वीकारले असून लवकरच लाभार्थी यांना त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन लवकरात लवकर संगणक उपलब्ध करुन देण्याचे आश्वसन देण्यात आले असून निवेदन देतांना सावली संघटनेचे तालुका अध्यक्ष चांद शेख, उपाध्यक्ष संभाजी गुठे, हरिभाऊ रकटे, नवनाथ घुले, आदी उपस्थित होते.

> दिव्यांग, वृद्ध, विधवा महिला लाभार्थींना ई केवायसी करणे कामी त्रास होणार नाही याकरिता सोमवार पर्यंत संगणक उपलब्ध करुन द्यावे. संगणक उपलब्ध करुन न दिल्यास सावली दिव्यांग संघटनेकडून आंदोलन करण्यात येईल. दिव्यांगावर व संघटनेवर आंदोलनाची वेळ येऊ देऊ नये.
>
> **-चांद शेख**
> **तालुकाध्यक्ष सावली दिव्यांग संघटना.**

# नेवासेत पसरले भक्तीमय वातावरण

## ऐतिहासिक ज्ञानेश्वरी पालखी सोहळा यावर्षीपासून सुरू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : ज्ञानेश्वराची कर्मभूमी ज्ञानेश्वरी लिखाणस्थान असलेल्या नेवासा शहरातून ऐतिहासिक ज्ञानेश्वरी पालखी सोहळा यावर्षीपासून सुरू होत आहे.

या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर संपूर्ण शहरात भक्तीमय उत्साहाचे वारे पसरले आहेत. ऐतिहासिक सोहळ्याचा भाग होण्यासाठी नेवासकर नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत आहे. ज्ञानेश्वर मंदिर विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष पांडुरंग अभंग, देविदास महाराज मस्के व विश्वस्त मंडळाने यावर्षी पुढाकार घेतल्याने नेवासातून ऐतिहासिक दिंडी सोहळा सुरू होत आहे.

देहू आळंदी त्र्यंबकेश्वर या देवस्थानाच्या धरतीवर हा सोहळा सुरू होत असल्याने त्याच धर्तीवर या सोहळ्यामध्ये पहिल्याच वर्षी सुमारे २५ ते ३० दिंड्या सहभागी होत आहेत. सर्व दिंड्यांचे प्रस्थान १९ जून रोजी दुपारी तीन वाजता होत असून या दिंड्यांच्या पहिले रिंगण




सोहळा हा नेवासा बसस्थानकामध्ये प्रचंड उत्साहामध्ये होत आहे.

महाराष्ट्रातील सर्वात शिस्तबद्ध आणि सुंदर दिंडी असलेली दत्त देवगडची दिंडी कोरोना काळापासून बंद झाल्यामुळे नेवासा शहरातील तो यावर्षी ज्ञानेश्वरी दिंडी सोहळ्याच्या निमित्ताने पुन्हा सुरू होत आहे. १९ तारखेला दुपारी तीन वाजता सदरच्या दिंड्यांचे प्रस्थान होत असून नेवासा शहरातून या दिंड्यांची नगर प्रदक्षिणा मार्गक्रमण होत असताना नेवासातील गावकऱ्यांनी ठिकठिकाणी स्वागत कमानी उभारणे दिंडी मार्गावर साड्या रांगोळी तसेच आलेल्या दिंडी वर पुष्पृष्टी करणे असे विविध संकल्प केलेले आहेत.

विशेष म्हणजे पालखी प्रस्थानचे पहिल्या दिवशीचा मुक्काम हा नेवासा शहराबाहेर असलेल्या आराध्या मंगल कार्यालयमध्ये आहे. या ठिकाणी सुमारे वीस ते पंचवीस हजार वारकऱ्यांचे पहिले मानाचे अन्नदान नेवासा शहर आणि नेवासा बुद्रुक या दोन शहरांमधून लोकवर्गणीद्वारे केले जाणार आहे. यामध्ये सर्वधर्मीय आणि सर्वपक्षीय नागरिकांनी मोठ्या उत्साहामध्ये भाग घेतलेला आहे. हा ऐतिहासिक सोहळा वारकरी परंपरेत नवा अध्याय ठरणार आहे, असा विश्वास स्थानिक भाविक व्यक्त करत आहेत.

# सायकलवारी २० जूनला पंढरपूरकडे होणार खाना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : आषाढी वारी निमित्ताने दि. २० ते २२ जून दरम्यान श्रीरामपूर ते श्रीक्षेत्र पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आले आहे, अशी माहिती श्रीरामपूर सायकलिंग क्लबचे प्रमुख डॉ. संकेत मुंदडा यांनी दिली.



श्रीरामपूर सायकलिंग क्लबच्या वतीने यावर्षी ही पंढरपूर सायकल वारीचे आयोजन करण्यात आले आहे. या वारी साठी सायकलिंगचा सराव सुरू असून आतापर्यंत देवगड, सरलाबेट, नेवासा, संगमनेर गणपती, ताहराबाद, पुणतांबा, राहुरी कारखाना, लोणी, कोल्हार, गणेशखिंड, शिवनेरी किल्ला, पळशी (ता. पारनेर), देवळाली प्रवरा, शिर्डी आदी देवस्थानांना भेटी दिल्या आहे. दर रविवारी साधारण १०० कि.मी. सायकल प्रवासाचा सराव करण्यात येत आहे.

या सायकल वारीचे प्रस्थान शुक्रवारी दि. २० जून रोजी पहाटे ५ वाजता शहरातील श्रीराम मंदिर चौकातून शहरातील मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. सायकल वारीचे हे दुसरे वर्ष असून जवळपास ८० पेक्षा जास्त जणांनी सहभाग नोंदवला आहे. यात ६ ते ७ महिलांचाही सहभाग आहे. दि. २० जून रोजी संध्याकाळी करमळा येथे मुक्काम आहे, तर दि. २१ जून रोजी टेंभुर्णी मार्गे पंढरपूर येथे पोहचणार आहे. यावर्षी राज्यभारातील सायकलिंग ग्रुप पंढरपुरात एकत्र येणार असून राज्यातील ८७ सायकलिंग क्लबच्या सायकलपटूंचे संमेलन व वारकऱ्यांप्रमाणे सायकलस्वारांचा रिंगण सोहळा २२ जूनला पार पडणार आहे. यात राज्यभरातून जवळपास साडेतीन हजार सायकलपटू सहभागी होणार आहेत. यावेळी रॅली, पुरस्कार वितरण व अन्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या वर्षाच्या श्रीरामपूर ते पंढरपूर सायकल वारीच्या यशस्वीतेसाठी दविंदर सिंग धुप्पड, गणेश बनकर, अच्युत औताडे, विकास झगडे, नितीन देशमुख, हार्दिक जोशी, श्रवण सोमाणी, अभिमन्यू मांडण, श्रीकांत दहिमिवाल आदींसह श्रीरामपूर सायकलिंग क्लबचे सर्व सदस्य परिश्रम घेत आहेत.

# स्वागताने शैक्षणिक वर्षाची सुरुवात

## प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल उपक्रम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा गर्ल्स इंग्लिश मीडियम स्कूल अँड



ज्युनिअर कॉलेज, लोणी नवीन शैक्षणिक वर्षाचा प्रारंभ अत्यंत आनंददायी आणि संस्मरणीय वातावरणात झाला. पहिल्या दिवशीच शाळेचे संपूर्ण परिसर फुलांनी, तोरणांनी व आकर्षक सजावटीने सजले होते, जणू काही शाळा आपल्या लाडक्या विद्यार्थिनींच्या स्वागतासाठी सज्ज झाली होती.

प्राचार्या रेखा रत्नपारखी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षकांच्या उपस्थितीत विद्यार्थिनींचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करण्यात आले. त्यानंतर त्यांच्या अंगावर फुलांची उधळण करत त्यांचे भरभरून स्वागत करण्यात आले. हा क्षण प्रत्येक विद्यार्थिनीसाठी आनंदाचा आणि स्नेहभावनेने भरलेला ठरला. प्राचार्या मॅडम यांच्या हस्ते विद्यार्थिनींना आरोग्यदायी गूळ-शेंगदाण्याचे लाडू खाऊ म्हणून व पेन्सिल भेटवस्तू म्हणून देण्यात आली. या छोट्याशा भेटीतून प्रेम, काळजी आणि नवा उत्साह यांचा संदेश मिळाला.शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थिनींच्या चेहऱ्यावर एक वेगळीच उत्साही चमक दिसून येत होती. नवीन वर्ग, नवीन पुस्तके, नवीन स्वप्ने आणि नवीन उर्जा याने संपूर्ण परिसर भरून गेला होता.

# बोल्हेगाव परिसरात पावसाचा कहर

## लाईटचे पोल, तारा तुटल्या; झाडे पडली

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : शहरामध्ये सायंकाळी आठच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावल्यामुळे बोल्हेगाव परिसरामध्ये अक्षरश मोठमोठी झाडे रस्त्यावर कोलमडून पडली. त्यामुळे लाईटचे पोल, तारा रस्त्यावर तुटुन पडल्या असल्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले.



मनपा स्थायी समितीचे माजी सभापती कुमारसिंह वाकळे यांनी तातडीने घटनास्थळी दाखल होत परिस्थितीची पाहणी केली व शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधत परिस्थितीची माहिती दिली त्यानंतर आमदार संग्राम जगताप यांनी तातडीने महापालिका आपत्कालीन विभागाशी संपर्क साधत अधिकारी कर्मचारी यांना घटनास्थळी पाठवलेमाजी सभापती कुमारसिंह वाकळे म्हणाले, वादळी वाऱ्यासह झालेल्या पावसात रस्त्यावर मोठमोठे झाडे पडली होती ते तातडीने काढण्याचे काम केले त्यामुळे नागरिकांचे जनजीवन पूर्वपदावर येण्यास मदत झाली, गावातील युवकांनी भर पावसात आपत्कालीन परिस्थिती मधील कर्मचाऱ्यांना मदत केली तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या तत्परतेमुळे बोल्हेगावातील आपत्कालीन परिस्थितीतील कामे तातडीने मार्गी लागत नागरिकांना दिलासा देण्याचे काम केले असे त्यांनी सांगितले.

# गरजवंत रुग्णांना केली आर्थिक मदत

## श्री साई द्वारका ट्रस्टचे कार्य कौतुकास्पद - मोहिते




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने गरजूवंत रुग्णांना वर्षभर वैद्यकीय मदत देण्याचे काम केले आहे. या माध्यमातून रुग्ण आपल्या आजारपणाची प्राथमिक तपासणी करून घेतो व त्यानुसार डॉ. वैद्यकीय उपचार करत असतात ॲड. धनंजय जाधव यांचे सुरू असलेले सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. त्यांनी नेहमीच समाजातील दीनदुबळ्यांची सेवा करण्याचे काम केले आहे. स्व. कृष्णा जाधव यांच्या विचाराचा वारसा ते पुढे चालवीत आहे, असे प्रतिपादन भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले.श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या वतीने ॲड. धनंजय जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त गरजूवंत रुग्णांना आर्थिक मदत व शालेय साहित्याचे वाटप भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी नगरसेवक ॲड. धनंजय जाधव, निखिल वारे, संजय ढोणे, अशोक गायकवाड, विठ्ठल लांडगे, राजेंद्र काळे, दत्ता गाडळकर, उदय अनभुले, सुरेश लालबागे, सोमनाथ जाधव, पोपट पाथरे आदी उपस्थित होते.

# शहीद स्मारक एक पवित्र स्थान ठरेल -मेजर जनरल विक्रम वर्मा

## सैनिक लॉन येथे शहीद स्मारकाचे अनावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : देशाच्या संरक्षणासाठी प्राणार्पण करणाऱ्या जवानांच्या बलिदानाची आठवण व प्रेरणा कायमस्वरूपी जिवंत ठेवण्यासाठी उभारण्यात आलेले हे शहीद स्मारक एक पवित्र स्थान ठरेल, असे प्रतिपादन मेजर जनरल विक्रम वर्मा यांनी केले.

अहिल्यानगर शहरातील सैनिक लॉन येथे आयोजित शहीद स्मारक अनावरण समारंभाप्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया, ब्रिगेडियर सुनील कुमार, पद्मश्री पोपटराव पवार, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी सागर कोरडे, रोटरी क्लबचे डॉ.प्रसन्न देवचक्के आदी उपस्थित होते.

मेजर जनरल विक्रम वर्मा म्हणाले, देश रक्षणार्थ जवान आपले सर्वस्व पणाला लावून सीमेवर लढत असतात. त्यांच्या या बलिदानाचे स्मरण निश्चितच सर्व देशवासियांना असले पाहिजे. देशसेवा ही सर्वोच्च सेवा असून नागरिकांनी, सेवानिवृत्त सैनिकांनी तरुणांना सैन्यामध्ये भरती होऊन देशसेवेसाठी प्रवृत्त केले पाहिजे. नौदल, एनडीएमध्ये महिलांचा सहभाग वाढत आहे. सैन्याच्या सक्षमीकरणामध्ये महिलांचे मोठे योगदान राहणार असून अहिल्यानगर येथील सैनिकी मुलींच्या वसतीगृहातून अधिकाधिक विद्यार्थीनी अधिकारी म्हणून सैन्यामध्ये भरती व्हाव्यात. निवृत्त सैनिकांना त्यांच्या सेवा काळामध्ये आलेल्या अनुभवाचा लाभ विविध उपक्रमाच्या माध्यमातून गावकऱ्यांना करुन द्यावा. सैन्य सेवेतून जरी निवृत्त झाले असलात तरी देशसेवेतून निवृत्त होऊ नका, असे आवाहनही वर्मा यांनी यावेळी केली.

> पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले, शहीद जवानांच्या बलिदानाचे स्मरण चिरंतर स्मरणात रहावे यासाठी उभारण्यात आलेले शहीद स्मारक हे जवानांच्या त्यागाची साक्ष आहे. जिल्हा प्रशासन व सेना विभागाच्या माध्यमातून शासनाच्या सहभागाने गावांना दत्तक घेऊन एक आदर्श मॉडेल गाव म्हणून विकसित करण्याचा मानस व्यक्त करत माजी सैनिक व प्रशासनातील अधिकाऱ्यांनी एक बैठक हिवरेबाजार येथे घेऊन त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले, जिल्ह्यात देशसेवा करणाऱ्या सैनिकांची मोठी संख्या आहे. देशसेवा करत असताना ५१ सैनिकांनी बलिदान दिले आहे. त्यांच्या स्मरणानार्थ शहीद स्मारक उभारण्यात आले आहे. हे स्मारक जिल्हा वासियांना प्रेरणा देणारे ठरेल. गतवर्षात ५ कोटी रुपयांचे ध्वजदिन निधी संकलन करुन जिल्हा राज्यात अग्रेसर राहीला. यावर्षी आतापर्यंत साडेतीन कोटी रुपयांच्या निधीचे संकलन करण्यात आले असून गतवर्षीपेक्षा अधिकचा निधी संकलन करण्याचा संकल्प करण्यात आला असल्याचेही ते म्हणाले.

ब्रिगेडियर सुनील कुमार म्हणाले, देशवासियांची सुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी शहीद सैनिकांच्या बलिदानाचे स्मरण होण्यासाठी शहीद स्मारक उभारण्यात आले आहे. सैनिकांनी त्यांचा परिवार, त्यांची स्वप्ने, घरातील सुख-सुविधा बाजूला सारत देशाच्या सुरक्षेला प्राधान्य दिल्यानेच आज आपण सुरक्षित आहोत. या शहीद स्मारकातून येणाऱ्या पिढ्या सैनिकांचे बलिदानचे नव्हे साहस, सन्मान आणि स्वतंत्रेच्या ताकदीची माहितीही यातून जाणून घेतील. रोटरी क्लबचे डॉ.प्रसन्न देवचक्के, वीरपत्नी अंबिका भोंदे, यांनीही मनोगत व्यक्त केले.

# गोदावरीच्या लाभधारक शेतकऱ्यांना पाण्यासह सिंचनाचे आवर्तन

## कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण यांची माहिती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी :** मागील वर्षी पावसाळ्यात समाधानकारक पर्जन्यमान झाल्यामुळे चालू वर्षी सर्वच धरणे पूर्ण क्षमतेने भरलेली होती. त्यामुळे आ. आशुतोष काळे यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत केलेली मागणी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील ह्यांनी मान्य केली होती. त्या मागणीनुसार सुरु असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या आवर्तना बरोबरच शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सिंचनाचे देखील आवर्तन होणार असल्याची माहिती कर्मवीर शंकरराव काळे मित्र मंडळाचे अध्यक्ष कारभारी आगवण यांनी दिली आहे.

> मान्सूनची सुरु असलेली वाटचाल रखडल्यामुळे जून महिन्याच्या सुरुवातीला पाऊस न पडता उष्णता मोठ्या प्रमाणात वाढली असून साहजिकच त्याचा फटका उभ्या पिकांना बसण्याची शक्यता नाकारता येणार नाही याची जाणीव असणाऱ्या आ. काळे यांनी पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना सुरु असलेल्या पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनासाठी देखील पाणी देण्याच्या सूचना केल्या आहेत. त्यामुळे ज्या ज्या लाभधारक शेतकऱ्यांच्या सिंचनासाठी पाण्याची मागणी येईल त्या त्या शेतकऱ्यांना पिण्याच्या पाण्याबरोबरच सिंचनासाठी पाणी उपलब्ध होणार आहे.
>
> **– कारभारी आगवण**



६ डिसेंबर २०२५ मध्ये राहाता येथे जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत पाटबंधारे विभागाने एक रब्बी व दोन उन्हाळी आवर्तन देण्यास सहमती दिली होती. मात्र पाण्याची जास्तीत जास्त बचत करून तीन आवर्तनाचे चार आवर्तन करावे, अशी आग्रही मागणी आ. आशुतोष काळे यांनी कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत जलसंपदा मंत्री विखे पाटील यांच्याकडे केली असता त्या मागणीला जलसंपदा मंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता.

त्यानुसार सध्या उन्हाळी आवर्तन सुरु आहे. गोदावरी कालव्याच्या लाभधारक शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाण्याची उणीव भासू नये यासाठी आ. काळे सातत्याने जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संपर्कात आहेत. त्यामुळे कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे गोदावरी कालव्यांना नियमितपणे वेळेवर आवर्तन सोडले जात असून पिण्याच्या पाण्याचे व सिंचनाचे योग्य नियोजन झाले आहे.

मे महिन्यात झालेल्या अवकाळी पावसामुळे रब्बी हंगाम उरकल्यानंतर शेतात उभ्या असलेल्या चारा पिकांना, ऊस व फळबागांना काही प्रमाणात दिलासा मिळाला होता व जून महिन्यात सुरुवातीलाच पाऊस सुरु होईल असा अंदाज हवामान खात्याने दरवर्षीपेक्षा अगोदरच दाखल झालेल्या मान्सूनच्या आगमनामुळे वर्तविला होता.

# डॉ. विखे पाटीलच्या २६ विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** विळद घाट येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयातील ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागामार्फत इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिरिंग विभागातील विद्यार्थ्यांकरीता करीअर घडवण्याच्या दृष्टीने एकुण ८ कंपन्यांद्वारे चतुर्थ वर्ष इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअर विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या.

या मुलाखती दरम्यान विद्यार्थ्यांची प्रथम योग्यता चाचणी घेण्यात आली. त्यानंतर तांत्रिक चाचणी आणि प्रत्यक्ष मुलाखतीद्वारे इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागातील एकुण २६ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

स्नेहल पांडुरंग कोतकर हिची पुणे येथील कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत निवड होऊन सर्वात मोठे पॅकेज मिळाले. यावेळी बोलताना ती असे म्हणाली की या नोकरीमुळे माझ्या करिअरला एक चांगली दिशा मिळाली आहे.

तसेच बुद्धिमत्ता चाचणी, स्पर्धा परीक्षा तयारी, मुलाखत कौशल्य आणि व्यक्तिमत्व विकास या सारख्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक मुलाखतीस सामोरे जाण्यासाठी आत्म विश्वास मिळाला. माझ्या यशामध्ये माझे आई-वडील, कॉलेजचे प्राचार्य, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल, आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन डिपार्टमेंटच्या शिक्षकांनी वेळोवेळी केलेल्या मोलाच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. पुणे येथील कोरिझो प्रायव्हेट लिमिटेड, सिरमा एसजीएस टेक्नॉलॉजी लिमिटेड, मनस्वी टेक सोल्युशन्स प्रा. लि. ईगलबाइट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड, क्यूस्पायडर सॉफ्टवेअर सोल्यूशन, लॉजिपूल इन्फोटेक तर अहिल्यानगर येथील एपिटोम कंपोनेंट्स प्रायव्हेट लिमिटेड, फ्लेअर्स सोलर पीव्ही सिस्टीम्स, जी. एस. इंडस्ट्रीज या इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलेकम्युनिकेशन क्षेत्रातील अग्रगण्य कंपन्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना सरासरी चार लाख आणि कमाल साडेसहा लाख रुपयांचे वार्षिक पॅकेज देण्यात आले आहे.



> ### दिग्गज मान्यवरांकडून विद्यार्थ्यांचे कौतुक
>
> विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन तसेच पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी माजी खा. डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेचे डायरेक्टर जनरल प्रशासन डॉ. पी. एम. गायकवाड, डायरेक्टर-टेक्निकल प्रा. सुनिल कल्हापुरे व प्राचार्य डॉ. रविंद्र नवथर, इलेक्ट्रॉनिक्स अ‍ॅड टेलेकम्युनिकेशन इंजिनिअरिंग विभाग प्रमुख डॉ. अनिता पाटील, ट्रेनिंग अ‍ॅण्ड प्लेसमेंट ऑफीसर प्रा. सुदर्शन दिवटे, विभागीय शिक्षक समन्वयक प्रा. अमोल लांडगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांच्या उज्वल भवितव्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# सह्याद्री छावाचे रावसाहेब काळेंचा शिवसेनेत प्रवेश

## पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी स्वागत करुन केला सत्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** सह्याद्री छावा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष तथा कामगार नेते रावसाहेब शंकर काळे यांनी शिवसेनेत (शिंदे गट) कार्यकर्त्यांसह प्रवेश केला. शहरात नुकताच झालेल्या पदाधिकारी मेळाव्यात राज्याचे पर्यटन व सांस्कृतिक मंत्री तथा संपर्क मंत्री शंभूराज देसाई यांनी त्यांचे पक्षात स्वागत करुन सत्कार केला.

यावेळी आ. अमोल खताळ, आ. विठ्ठलराव लंघे पाटील, जिल्हाप्रमुख अनिल शिंदे, बाबूशेठ टायरवाले, शहर प्रमुख सचिन जाधव, संभाजी कदम, दिलीप सातपुते, कमलाकर कोते, नितीन औताडे, नगर तालुका प्रमुख अजित दळवी, रामदास भोर, मनोहर पोटे, नंदकुमार ताडे, सागर बेग, माजी महापौर शिलाताई शिंदे, सुरेखा कदम, रोहिणीताई शेंडगे, अनुसूचित जाती विभागाचे जिल्हाप्रमुख किशोर वाघमारे, अनुसूचित जाती विभागाचे दक्षिण जिल्हाप्रमुख सुभाष आल्हाट आदी उपस्थित होते.

रावसाहेब काळे सह्याद्री छावा संघटना व धडक जनरल कामगार संघटनेच्या माध्यमातून जिल्ह्यात कार्यरत आहे. सर्वसामान्यांच्या विविध प्रश्नांवर आवाज उठवून त्यांना न्याय मिळवून देण्याचे काम करत आहे. कामगारांच्या न्याय, हक्कासाठी त्यांचा लढा सुरु आहे.



> जिल्ह्यात गाव तेथे शाखा सुरु करण्याचा संकल्प केला असून, कामगारांना शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे. महापालिकेच्या निवडणुकांमध्ये शिवसेनेचा भगवा महापालिकेवर फडकविण्यासाठी सर्व कार्यकर्ते प्रयत्नशील आहे.
>
> **– रावसाहेब काळे**

# आत्मा मालिक संस्था प्रेरणा गौरव पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोकमठाण :** कल्याणी महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था नाशिक या संस्थेच्या वतीने अध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल आत्मा मालिक ध्यानपिठ कोकमठाण या संस्थेस नुकताच राष्ट्रीय प्रेरणा गौरव पुरस्कार देवून गौरविण्यात आले.

अध्यात्मिक, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात काम करणाया संस्थासाठी हा पुरस्कार मानाचा व विशेष सन्मानाचा मानला जातो. हा पुरस्कार धर्मदाय सहआयुक्त म. ला. जोगी यांचे शुभहस्ते प्रदान करण्यात आला.

आत्मा मालिक संस्थेच्या वतीने संस्थेचे मुख्य लेखापाल गोपाल कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी व्यासपिठावर रामकृष्ण आरोग्य संस्थान नाशिकचे अध्यक्ष स्वामी कंठानंद, धर्मदाय आयुक्त वी. र. सोनुने, धर्मदाय सह आयुक्त म. ला. जोगी आदी मान्यवर उपस्थित होते.



> आत्मा मालिक संस्था शैक्षणिक आरोग्य, सामाजिक, अध्यात्मिक या क्षेत्रात अनेक वर्षापासून तळमळीने जनसेवेचे कार्य करत आहे. संस्थेच्या या कार्याची दखल घेवून पुरस्कृत केले याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे. सदर पुरस्कार म्हणजे ध्यानपीठातील सर्व कर्मचारी व सर्व घटकांच्या अथक परिश्रमांना आणि समाजासाठी केलेल्या समर्पित सेवेला मिळालेली मान्यता आहे.
>
> **– नंदकुमार सुर्यवंशी**

# ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या मेडिटेशन हॉलचे लोकार्पण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** येथील ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या मेडिटेशन हॉलचे लोकार्पण आदरणीय राज योगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदीजींच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी राज योगिनी ब्रह्मकुमारी नलिनी दीदीजी व राज योगिनी ब्रह्मकुमारी उषा दीदीजी त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याचे माजी दुग्धविकास मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा सहकारी बँकेचे चेअरमन भास्करराव खर्डे पाटील, कोल्हारचे माजी सरपंच अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील, प्रसिद्ध उद्योजक अजित कुंकूलोळ, व्यापारी पतसंस्थेचे अध्यक्ष संजय शिंगवी, प्रगतशील शेतकरी संपतराव खर्डे पाटील, रामनाथ आरोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.




प्रथम दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. राजयोग म्हणजे ईश्वराच्या समीप जाणेआणि या मेडिटेशन हॉलच्या माध्यमातून समाजामध्ये आपसी एकता आणि विश्वासाचे वातावरण निर्माण होईलच त्याचबरोबर जीवनामध्ये मनशांती आणि ईश्वरीय शक्ती प्राप्त होईल, हा उदात्त हेतू ठेवूनच ह्या भव्य मेडिटेशन हॉलचे निर्माण कार्य करून लोकार्पण करण्यात आल्याचे राज योगिनी ब्रह्मकुमारी सुनंदा दीदीजी यांनी सांगितले.

ब्रह्मकुमार शिवाजी भाई यांनी ५३ वर्ष समर्पित होऊन कार्य केल्याबद्दल तसेच कोल्हार सेंटरच्या संचालिका स्वाती दीदीजी व सोनगाव सेंटरच्या संचालिका पद्मा बहेनजी यांचा गौरव केला.

कोल्हारचे माजी सरपंच अ‍ॅड. सुरेंद्र खर्डे पाटील यांनी देखील सध्याच्या मानवी जीवन शैलीत मानसिक स्वास्थ्यासाठी मेडिटेशन किती गरजेचे आहे. हे स्व-अनुभवावरून पटवून दिले. जीवनातील सर्व प्रकारचा संघर्ष टाळून सर्व आत्म्यांना सुख शांती द्यायची असेल, तर मेडिटेशन खूप गरजेचे असल्याचे माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील यांनी सांगितले.

याप्रसंगी कुमारी श्राव्या सोमवंशी रुही पटेल व ज्ञानेश्वरी देटके यांनी सुरेख नृत्य करून सर्वांचे स्वागत केले. राजयोगिनी नलिनी दीदीजी, राजयोगिनी उषा दीदीजी, रामनाथ भाईजी, संजय शिंगवी यांनी मनोगत व्यक्त केले. शिवाजी आप्पा यांनी आभार मानले. यात्प्रसंगी परिसरातील सर्व सेंटरचे भाई बहेनजी उपस्थित होते.

# वडाच्या वृक्षारोपणातून संस्कृतीचे अनोखे संगम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने पारनेर तालुक्यातील सुपा येथे वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण सध्या सुरु आहे. प्रशिक्षणाच्या व्यस्त वेळापत्रकातही महिलांनी वटपौर्णिमेसारखा पारंपरिक सण वडाच्या झाडाची लागवड करुन पर्यावरणस्नेही पद्धतीने साजरा केला.

वटपौर्णिमेच्या दिवशी प्रशिक्षणार्थी महिला शिक्षकांनी सुपा येथील प्रशिक्षण केंद्राच्या आवारात वडाच्या झाडांची रोपं लावून त्यांचे पूजन केले. पारंपरिक पद्धतीने पूजन करत सणाच्या निमित्ताने वृक्षारोपणासह



पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला.

महिला प्रशिक्षणार्थींनी या सणासाठी विशेष सुट्टीची मागणी केली होती. मात्र प्रशिक्षणाचे वेळापत्रक लक्षात घेता कोणताही खंड न पडू देता प्रशिक्षणस्थळीच सण साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला. वरिष्ठ वेतन श्रेणीच्या प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थींना पूर्णवेळ उपस्थित राहून, प्रत्येक तासिकेला उपस्थितीची स्वाक्षरी अनिवार्य असल्याने सदर प्रशिक्षणातील शिक्षक महिलांनी सण व प्रशिक्षण एकाचवेळी साध्य केले.

संगमनेरचे डायट प्राचार्य डॉ. राजेश बनकर यांच्या हस्ते वडाचे झाड लावून महिलांनी त्याचे पूजन करुन वटपौर्णिमा साजरी केली. यावेळी प्रशिक्षणार्थी सीमा व्यवहारे, सुवर्णा भोर, पूनम निमसे, शितल राऊत, जयश्री भुतकर, वर्षा शिंदे, स्वाती कोल्हे, मनिषा जगदाळे, तहेसीन शेख, प्रशिक्षण तज्ज्ञ सुलभक विशाल पाचारणे, ज्ञानेश्वर इंगळे, प्रवीणचंद्र गुंजाळ, सतीश चव्हाण, न्यू इंग्लिश स्कूल सुपाचे प्राचार्य मंगेश जाधव, डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता व प्रशिक्षणाचे केंद्र संचालक लक्ष्मण सुपे उपस्थित होते.

# चक्क १३ कंपनी अन् १२२ विद्यार्थ्यांचा सहभाग

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नेप्ती येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज अभियांत्रिकी महाविद्यालय या ठिकाणी १२ जून रोजी झालेल्या भरती मेळाव्यामध्ये १३ कंपन्यांनी आपला सहभाग नोंदवत कम्प्युटर इंजिनिअरिंग, मेकॅनिकल इंजिनिअरिंग आणि इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग विभागाच्या जवळपास १२२ विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या.



हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयामध्ये कार्यरत असणाऱ्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभाग अधिकारी प्रा. एस. एम. वाळके तसेच समन्वयक प्रा. जी. बी. साळुंके, प्रा. ए. आर. माने, प्रा. पी. डी. कोतकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन करून विद्यार्थ्यांना सहकार्य केले. विभागप्रमुख डॉ.

### छत्रपती अभियांत्रिकी मध्ये १२ जून रोजी झाला होता भरती मेळावा

एम. के. भोसले, प्रा. एस. पी. विधाते, प्रा. ए. बी. काळे, प्रा. पी. जी. निकम, डॉ. व्ही. व्ही. पाटील यांनी सर्व विभागातील विद्यार्थ्यांपर्यंत तसेच इतर महाविद्यालयातील विद्यार्थ्यांपर्यंत या भरती मेळाव्याची माहिती पोहोचवण्यासाठी मुलाचे सहकार्य केले. भरती मेळाव्यामध्ये घेण्यात आलेल्या मुलाखतींचे निकाल पुढील दोन-तीन दिवसांमध्ये जाहीर करणार असल्याचे कंपन्यांचे एच. आर. यांनी सांगितले.

> मुलाखत ही केवळ एक प्रश्न-उत्तर प्रक्रिया नसून, ती विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व, अनुभव आणि कौशल्यांची चाचणी घेते असे मत मांडत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या नोकरीच्या संधीचा लाभ घ्यावा.
>
> **– डॉ. वाय. आर. खर्डे, प्राचार्य**

# शिर्डीत पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन करत प्रहारच्या बच्चू कडूंना पाठिंबा

## आंदोलन तीव्र करण्याचा इशारा : विजय काकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी / राहाता :** शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, दिव्यांगांना महिन्याला सहा हजार रुपये मिळावेत आदी मागणीसाठी गेल्या पाच दिवसापासून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चु कडू यांनी उपोषण सुरू केले आहे.याच आंदोलनाला समर्थन म्हणून शिर्डी शहरात प्रहारच्या वतीने शोले स्टाईल आंदोलन करत पाठीबा देण्यात आला.

शिर्डी नगरपंचायत जवळील पाण्याचे टाकीवर चढून प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुकाध्यक्ष अमोल बानाईत, युवक तालुका अध्यक्ष विजय काकडे, शिर्डी शहर अध्यक्ष विकी मिसाळ आणि कार्यकर्त्यांनी शोले स्टाईल आंदोलन करत यावेळेस सरकारने तात्काळ बच्चु कडू यांच्या मागण्यांची दखल घ्यावी. अन्यथा राज्यभर यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला.

बच्चु कडू यांच्या आंदोलनाची दखल घ्यावी व त्यांच्या जीविताला काही कमी जास्त झालं तर १३ तारखेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात अनोख्या आणि मोठ्या पद्धतीने या ठिकाणी आंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा देत सरकारला जाग येण्यासाठी आज आम्ही शिर्डी नगरपंचायतच्या पाण्याच्या टाकीवर चढून या ठिकाणी आंदोलन केलेले आहे.



शेतकऱ्यांची कर्जमाफी संदर्भात लवकरात लवकर जर निर्णय घेतला नाही, तर यापेक्षाही देखील मोठ्या स्वरूपामध्ये आंदोलन करण्यात येईल, सगळ्यांचा नाद करा पण शेतकऱ्याचा नाद करू नका, असा इशाराही अमोल बानाईत यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांच्या हितासाठी व कर्जमाफीसाठी आंदोलन करत असलेल्या बच्चू कडू यांच्या जीविताला काही बरे-वाईट झाल्यास राज्यात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे थेट इशारा राज्य सरकारला दिला आहे.

यावेळी नितीन भन्साळी सुरेश गुगळे आरणे. कैलास यादगुडे हजर होते.

# विष्णूसह सोनाली यांची दुबईला अभ्यासासाठी निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पारनेर :** दुर्धर आजारांवर रामबाण उपाय ठरणाऱ्या आयुर्वेदिक फूड सप्लिमेंटचा प्रचार-प्रसार करणारे विष्णू शिवाजी अवचार व सोनाली विष्णू अवचार यांची दुबईला अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे. या दौऱ्यात ते भारतीय आयुर्वेदिक फूड प्रॉडक्टचा प्रचार-प्रसार करणार आहेत. रियांश मल्टिट्रेड कंपनीच्या वतीने अवचार दांम्पत्यांना सहा दिवसाठी अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक मधुकर जाधव व दत्ताजी मांडे यांनी दिली.

विष्णूलक्ष्मी प्रसाद फाउंडेशन संचालीका सोनाली व विष्णू अवचर (रा. राळेगण थेरपाळ ता. पारनेर) या गेल्या ३३ महिन्या पासून रियांश मल्टिट्रेड कंपनीच्या माध्यमातून ३३ महिन्यात ६० हजारांपेक्षा अधिक गरजू लोकांना कंपनीचे आयुर्वेदिक फुड सप्लिमेंट उपलब्ध करुन दिले. या आयुर्वेदिक उत्पादन विविध आजारांवर नवसंजीवनी देणारे ठरले आहे. अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात २ हजार पेक्षा अधिक युवक-युवती कार्यरत आहेत. रियांशचे अमृत ज्युस औषध म्हणून अनेकांना वरदान ठरत असून, या आयुर्वेदिक उत्पादनांचा प्रचार-प्रसार देशाबाहेर सुरु करण्यात आले. या निवडीबद्दल अवचार दांम्पत्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# श्रीरामपूरचे नागरिक रोज पितात दूषित पाणी

## जिल्हाधिकारी यांनी श्रीरामपूरच्या नागरी सुविधाची करावी पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर शहरातील नागरिकांना नागरी सुविधा देण्याची जबाबदारी नगरपालिकेचे असताना त्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसत आहे. नागरिकांना सातत्याने दूषित पाणीपुरवठा होत आहे, सार्वजनिक स्वच्छतागृहाची अवस्था तर भयानक आहे, चौका चौकात भाजीपाला विक्रेत्यांची बेकायदेशीर दुकाने सुरू आहेत. नगरपालिका प्रशासन नागरिकांच्या आरोग्याशी खेळ खेळत असल्याने भविष्यकाळात नागरिकांना साथीच्या आजाराचा सामना करावा लागणार आहे, याला सर्वस्वी नगरपालिकेचे मुख्याधिकारी हेच जबाबदार असून, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी श्रीरामपूर नगरपालिकेच्या नागरी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी करावी, पालिका नागरिकांना जे पाणी पिण्यासाठी देते, याची चव घ्यावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

ज्या प्रवरा कालव्यातून शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या साठवण तलावात पाणी घेतले जाते, या पाईपलाईनवर मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झालेली आहेत, काही लोकांनी पक्के घरे बांधलेली आहे, आशा घरातील सांडपाण्यासह स्वच्छतागृहाचे पाणी पाईपला मोठे छिद्र पाडून सोडण्यात आले आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून नागरिक याविषयी तक्रारी करतात. परंतु नगरपालिका त्याची दखल घेत नाही. मोरगेवस्तीसह शहरातील विविध भागात असलेल्या सार्वजनिक



स्वच्छतागृहाची अवस्था दयनीय झालेली आहे. अनेक स्वच्छतागृहांचे दरवाजे गायब आहे, त्या ठिकाणी पाण्याची सोय नाही, स्वच्छतागृहाची नियमित साफसफाई होत नाही, स्वच्छतागृहात जाण्यासाठी रस्ता नाही, काही ठिकानीं असलेल्या स्वच्छतागृहाच्या छतावर तर मोठमोठे झाडे आलेले आहेत, स्वच्छतेबाबतची कुठलीही सुविधा मिळत नाही, मग या कामावर होणारा लाखो रुपयांचा मुलीदा कोणाच्या खिशात जातो? ठेकेदाराला कोण पाठीशी घालत आहे, हा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे.

श्रीरामपूर शहरात मोठा गाजावाजा करून अतिक्रमणे काढण्यात आली, या अतिक्रमण मोहिमेची इतिहासात नोंद केली पाहिजे, एक महिन्यानंतर अतिक्रमण मोहीमेची गर्जना थंड झाली आणि इतकी थंड झाली ज्या ठिकाणी अतिक्रमणे काढण्यात आली त्या ठिकाणी पुन्हा नव्या जोमाने अतिक्रमणे झाली आहेत. मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांनी पुन्हा अतिक्रमण झाले तर गुन्हा दाखल करण्याचा दम दिला होता, मात्र त्याची अंमलबजावणी झालेली नाही.

### पाटबंधारे अतिक्रमणे केव्हा काढणार?

श्रीरामपूर शहरातून जाणारा प्रवरा उजवा व डावा कालव्यावरील अतिक्रमणे तात्काळ काढा, प्रवरा कालवा अतिक्रमणमुक्त करा, असा आदेश पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जलसंपदा विभागाला दिला होता, श्रीराम पूर जलसंपदा विभागाने कालवा परिसरात ८.६६ एकर क्षेत्रावरील अतिक्रमणे हटवण्यासाठी २,०७७ अतिक्रमण धारकांना सात दिवसाची तिसरी नोटीस दिली, नोटीस मुदत संपली असतानाही जलसंपदा विभागाने अजून कारवाई केलेली नाही. दोन्ही कालव्याची कचराकुंडी झालेली आहे.

# ज्येष्ठ नागरिकांची बैठक उत्साहात

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : राहाता येथे ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीची बैठक रविवारी ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे सुभाष मुंडाळे योच्या अध्यक्षतेखाली उत्साहात पार पडली. शासनाच्या निर्णयासह विविध विषयावर यावेळी चर्चा करण्यात आली.

समन्वय समिती अध्यक्ष ज्ञानेश्वर चौधरी यांनी ज्येष्ठ नागरिक महासंघ राहाता तालुका समन्वय समितीची माहिती देताना तालुक्यामध्ये गाव तेथे ज्येष्ठ नागरिक संघटना स्थापन करण्याची माहिती दिली. शासन निर्णयाप्रमाणे गाव तेथे विरंगुळा केंद्र स्थापन करणे बाबत प्रयत्न करण्यात येतील तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या अध्यक्षतेखारी प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये समिती तयार करून ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल. यासोबत अनेक शासनाच्या योजना ज्येष्ठापर्यंत पोहचवण्याचे काम समिती मार्फत करण्यात येईल, असे ज्ञानेश्वर चौधरी यांनी सांगितले.



याप्रसंगी अॅड, विजयराव जाधव यांनी समितीला कायदेशीर सल्ल्यासह मार्गदर्शन केले. प्रा. सुभाष पाथरकर यांनी साकुरी येथील संघामार्फत केलेल्या कामाबद्दल माहिती दिली. शेवटी समितीचे सचिव दगडू गोरे यांनी आभार मानले. यावेळी समितीचे उपाध्यक्ष गोरख मोटे, सचिव दगडू गोरे, सदस्य मच्छिद्र गाढवे, अॅड विजय जाधव, शशिकांत निलखे, प्रा. सुभाष पाथरकर, सुभाष सुंडाळे, रामभाऊ मुजमुले, शंकर लहारे, प्रतिभा गोरक्ष, रामनाथ मैड आदी उपस्थित होते.

# दारू पिण्याच्या वादातून एकावर ब्लेडने केले वार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर:** दारू पिण्याच्या वादातून वडगाव कोल्हाटी येथे एकाला ब्लेड व फायबरच्या दांडक्याने मारहाण करत गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना मंगळवारी घडली आहे. खुशबू उर्फ सागर शेख यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, मंगळवारी दुपारी ३:३० वाजता त्यांच्या मैत्रिणीसोबत घरी असताना लुकेश आव्हाड तेथे आला आणि आपले दारू प्यायचे ठरले होते, असे म्हणत वाद घालू लागला. सागरने त्यास नकार दिल्यानंतर त्याने आपला मावसभाऊ विकास आव्हाड यास बोलावले आणि दोघांनी मिळून शिवीगाळ करत त्याला मारहाण केली. यात त्याच्या मानेवर, उजव्या हातावर आणि पाठीवर गंभीर मार लागला. मारहाण थांबवण्याचा प्रयत्न करणाऱ्या मैत्रिणीलाही आरोपीने लाथा मारल्या. सागरने तेथून पळण्याचा प्रयत्न केला असता आरोपी लुकेश दांडा घेऊन त्याच्या मागे धावला आणि आम्ही डॉन आहोत, गल्लीत दिसलास तर जीव घेऊ अशी धमकी दिली. परिसरातील रहिवासी सतीश शेजवळ यांनी वाद सोडवण्याचा प्रयत्न केला. लुकेश विकास आव्हाड व आव्हाड या दोघाविरूद्ध एमआयडीसी ठाण्यात वाळूज पोलिस गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# वटपौर्णिमेनिमित्ताने तूर, सोयाबीन बियाणांची महिलांनी केली पूजा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : तालुक्यातील विळद येथील खोपेश्वर महिला शेतकरी बचतगटातील महिलांनी – वटपौर्णिमेनिमित्त वडाबरोबर बियाणांची पूजा केली. जन्मोजन्मी हाच पती मिळू दे या प्रार्थनेबरोबरच, शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन बळीराजाचा आर्थिक स्तर – उंचावून लहरी वातावरणापासून शेतकऱ्यांना सुरक्षित ठेव, अशी प्रार्थना या महिलांनी यावेळी केली. यावेळी मंडळ कृषी अधिकारी माधवी घोरपडे यांनी खरीप मोहिमा व लागवड तंत्रज्ञानाविषयी माहिती दिली. उप कृषी अधिकारी विजय सोमवंशी यांनी फळबाग लागवड योजना, महाडीबीटी रजिस्ट्रेशनबाबत माहिती दिली. बचतगट अध्यक्ष वैशाली वाळके, सचिव अर्चना आडसुरे, सदस्य सुरेखा आंबेकर, कांताबाई कोळेकर, वैशाली गायकवाड, सीमा जगताप, पौर्णिमा पवार, सत्यशीला आडसुरे, रत्नमाला वाळके, उषा वाळके, प्रियंका निमसे व प्रगतिशील शेतकरी कल्याण आडसुरे, दिनकर शिंदे, अशोक वाळके, शेतमळा शेतकरी कंपनी अध्यक्ष दत्तात्रय जगताप, विजय पवार उपस्थित होते.



### मदने यांनी महिलांना दाखवले बीजप्रात्यक्षिक

कृषी विभागामार्फत तूर व सोयाबीन –आंतरपिक प्रात्यक्षिक प्रकल्प राबवला जात आहे. प्रात्यक्षिकासाठी महाबीजमार्फत वेळेत बियाणे उपलब्ध झाले व मुहूर्त साधण्यासाठी खोपेश्वर महिला शेतकरी गटाने वडाबरोबर बियाणाचीही पूजा करण्याचे ठरवले. यावेळी सहाय्यक कृषी अधिकारी कविता मदने यांनी बियाणे उगवणक्षमता चाचणी व बीजप्रक्रिया प्रात्यक्षिक करुन दाखवले.

## जगदीश मंत्री यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : येथील वॉर्ड नं. ७, किशोर कुंज मागे वास्तव्यास असलेले व्यापारी जगदीश (प्रितम) रामेश्वर मंत्री (वय ४८) यांचे गुरूवार दि. १२ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगी, चुलते व बहिणी असा परिवार आहे. ते दत्तनगरचे किराणा व्यापारी सुरेश व सुभाष मंत्री यांचे पुतणे होते. त्यांच्या अकस्मात निधनाबद्दल मोरगे वस्ती परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. स्व. जगदीश मंत्री यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. यासाठी शिर्डी नेत्रविभाग नेत्रपिढी व भारतीय जैन संघटनेचे नेत्रदान नेत्रपिढी व भारतीय जैन संघटनेचे नेत्रदान समन्वयक अॅड. गौतम साबद्रा यांचे सहकार्य लाभले.

## राधाबाई देव्हारे यांचे निधन

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीरामपूर** : येथील नगरपालिका कार्यालयाजवळील खलीपे चाळीमध्ये वास्तव्यास असलेल्या शिंपी समाजातील जेष्ठ महिला श्रीमती राधाबाई किसनराव देव्हारे (वय ९१) यांचे बुधवार, दि. ११ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ४ मुली, सुन, दीर, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या साईश्रद्धा टेलर्सचे मालक किरण देव्हारे यांच्या मातोश्री व प्रभाकर देव्हारे यांच्या चुलती होत्या.

# दुचाकी, गॅसधारकांनाही मिळणार घरकुल; लाभधारकांची घरकुलाकडे पाठ, तरीही उद्दिष्टांचा मारा!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर** : प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यात दुचाकी, गॅस, रेफ्रिजरेटर, मोबाइल असलेल्या कुटुंबांना घरकुलाचा लाभदिला जात नव्हता. आता योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात ही अट रद्द केली आहे. त्यानुसार प्रधानमंत्री आवास योजना टप्पा क्रमांक दोनअंतर्गत जिल्ह्यातील अशा १ लाख २० कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले आहे. दुसरीकडे, याच योजनेसाठी शासनाने नव्याने ५७ हजार घरकुलांचे उद्दिष्ट दिले आहे.

सर्वांना मिळणार आता हक्काचे घर, या पंतप्रधानांच्या घोषणेनुसार डिसेंबर–जानेवारीमध्ये आपल्या जिल्ह्याला ७४ हजार ४०५ घरकुलांचे उद्दिष्ट दिले होते. त्यापैकी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (डीआरडीए) कार्यालयाने ७२ हजार ३२७ घरकुलांना मंजुरी दिली. यातील



६० हजार ४५० लाभार्थीना पहिला हप्ता देण्यात आला. पण दुसऱ्या हप्त्याकडे जवळपास ४० हजार लाभार्थीनी पाठ फिरवली आहे. असे असताना नुकतेच शासनाने या जिल्ह्यासाठी नव्याने ५७ हजार घरकुलांचे उद्दिष्ट दिले आहे. त्यानुसार प्रतीक्षा यादीतील लाभार्थीकडून जागेचा ८ अचा उतारा, आधार कार्ड, बँकेचे पासबुक आदी कागदपत्रांची म ागणी केली आहे. आधार कार्डाचे प्रम ाणीकरण झाल्यानंतर घरकुल मंजूर केली जाणार आहेत.

२०१८ मध्ये झालेल्या आवास प्लस सर्वेक्षणानुसार प्रतीक्षा यादीमध्ये अनेक कुटुंबांचा समावेश नसल्याने त्या कुटुंबांनाही आता घरकुलाचा लाभदेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार गेल्या महिन्यात ग्रामसेवकांच्या माध्यम ातून जिल्हाभरात १ लाख २० कुटुंबांचे सर्वेक्षण करण्यात आले. ग्रामसभेने या यादीला संमती दिल्यानंतर संबंधितांकडून कागदपत्रे घेतली जातील, असे डीआरडीएच्या सूत्रांनी सांगितले.

# किरकोळ कारणातून महिलेचा केला खून

## संगमनेर तालुक्यातील कर्जुले पठार येथील घटना

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : शेतात शौचाला गेल्याच्या कारणावरून एका महिलेचा खून करण्यात आला. दुसरी महिला गंभीर जखमी झाली आहे. ही घटना संगमनेर तालुक्याच्या पठार भागातील कर्जुले पठार येथे घडली. या प्रकरणी घारगाव पोलिस ठाण्यात तिघांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे.

यात एका महिलेचा समावेश आहे. रूपाली ज्ञानदेव वाघ (रा. कर्जुले पठार) असे मयत महिलेचे नाव आहे. मुरलीधर रामकृष्ण पडवळ, विक्रम मुरलीधर पडवळ आणि अलका विक्रम पडवळ (सर्व रा. कर्जुले पठार ता. संगमनेर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. त्यांच्याविरोधात मजुरी करणारे अजित दादाभाऊ वाघ (वय २५, रा. कर्जुले पठार) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

फिर्यादी अजित वाघ हे एकत्रित कुटुंबासह कर्जुले पठार येथे राहण्यास आहेत. त्यांच्या घराजवळच मुरलीधर पडवळ हा त्याचे कुटुंबासह राहतो. त्याची जवळच शेती आहे. वाघ यांच्या घरी शौचालय नसल्याने त्यांचे कुटुंबीय पडवळ याच्या शेतात अधूनमधून शौचास जातात. मंगळवारी संध्याकाळी फिर्यादी वाघ यांच्या वहिनी रूपाली वाघ या याच्या शेतात शौचास गेल्या होत्या. काही वेळातच त्या घरी आल्या.

विक्रम पडवळ याने आमच्या शेतात शौचासाठी का जाता? असे विचारत शिवीगाळ केल्याचे रुपाली यांनी कुटुंबियांना सांगितले. त्यानंतर रात्री ८ वाजेच्या सुमारास फिर्यादी वाघ हे भाऊ ज्ञानदेव, वहिनी रूपाली, बहीण मोनिका यांच्यासह विक्रम मुरलीधर पडवळ याच्या घरी जात माफी मागितली. मात्र विक्रम पडवळ, मुरलीधर पडवळ व अलका पडवळ यांनी वाघ कुटुंबीयांना शिवीगाळ, दमदाटी आणि जातीवाचक शिविगाळ केली. याचवेळी विक्रम पडवळ याने घरातून धारदार चाकू आणून रुपाली यांच्या पोटात भोसकला. यावेळी तिथे असलेल्या मोनिका वाघ यांच्यावरही पडवळ याने चाकू हल्ला केला.

## महेबूब शेख यांचा बोधेगावात सन्मान!

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बालमटाकळी** : शेवगाव तालुक्यातील बोधेगाव या ठिकाणी गुरुवार दि. १२ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाचे युवकचे प्रदेशाध्यक्ष महेबूबभाई शेख हे एका कार्यक्रमानिमित्त आले असता त्यांनी बोधेगाव येथील बन्नोमां दर्गा या ठिकाणी भेट दिली असून बोधेगाव येथील ग्रामस्थांनी त्यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान केला. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य प्रकाशबापू भोसले, माजी सरपंच रामजी अंधारे, वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष शाहूराव खंडागळे, सामाजिक कार्यकर्ते बाबाभाई पठाण, ग्रामपंचायत सदस्य बबन कुरेशी, ग्राम पंचायत सदस्य संदीप बानाईत, मातंग समाजाचे युवा नेते तथा सामाजिक कार्यकर्ते बन्सीभाऊ मिसाळ, आजीम पठाण, पत्रकार इसाक शेख यांच्यासह आदी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शाळेत पहिलीला दाखल होताहेत १६८१ विद्यार्थी

## २५ विद्यार्थ्यांचे जन्म दाखले, आधार कार्डच्या अडचणी केल्या दूर, दुर्गम भागात इंग्लिश मीडियमचे फॅड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अकोले** : अकोले शाळेची घंटा सोमवारी वाजणार असून, यंदा तालुक्यातील ३८८ जिल्हा परिषद प्राथमिक शाळांत १६८१ विद्यार्थी पहिल्या वर्गात प्रवेश घेत आहेत. यापैकी २५ विद्यार्थ्यांचे जन्म दाखले, आधार कार्ड बाबतच्या अडचणी दूर केल्या असून, १६५६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या शिक्षकांनी गाव शिवारातील वाडी, वस्तीत स्थानिक शाळा व्यवस्थापन समितीला सोबत घेऊन पिंजून काढली. गुरुजींनी मुलांच्या दारी जात पालक भेट घेतली, अर्जवी केली. त्यास प्रतिसाद मिळत असला तरी ग्रामीण भागातील पालकांचा कल इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे दिसून येत आहे. शेतकरी, शेतमजूर पालकांचादेखील कल इंग्रजी शाळांकडे आहे. इंग्रजी माध्यमाकडील ओढा कमी करण्यात जिल्हा परिषद शाळांतील शिक्षकांना काही प्रमाणात यश लाभले असले तरी कधी आईच्या इच्छेनुसार, तर कधी वडिलांच्या आग्रहाखातर मुले इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये दाखल होत असल्याचे सांगितले जात आहे.

यंदा पहिलीचा अभ्यासक्रम बदलला असून, तो सीबीएसईच्या धर्तीवर आला आहे. जिल्हा परिषद शाळांची गुणवत्तादेखील चांगली टिकून आहे. बहुतांश मराठी शाळांना मैदान आहे.

चांगल्या बोलक्या चित्रांच्या इमारती,



भौतिक सुविधा आहेत.

पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांच्या हाती पाठ्यपुस्तके व गणवेश देण्यासाठी प्रत्येक शाळेत पाठ्यपुस्तके व गणवेश दाखल झाले आहेत. इंग्रजी माध्यमाच्या शाळांपेक्षाही दर्जेदार शाळा ग्रामीण भागात दिसत असल्या तरी पालकांचा ओढा इंग्लिश मीडियम स्कूलकडेच का? हा प्रश्न मात्र अनुत्तरीत आहे. शहराप्रमाणेच दुर्गम ग्रामीण भागातदेखील इंग्लिश मीडियमचे फॅड अधिक असून, पालक शून्य ते सहा आपल्या गावातील अंगणवाडीत ठेवतात. तेथील सरकारी सर्व लाभ घेतात. पाल्य साडेपाच–सहा वर्षांचे झाले की मोठी फी भरून इंग्लिश मीडियम शाळेत पाठवतात. प्रवरा काठावरील बागायतदार गावात हे चित्र दिसते.

### शिक्षक व शिक्षण विभाग सतर्क

इंग्लिश मीडियम स्कूलकडे असलेला कल असाच वाढता राहिल्यास जिल्हा परिषद शाळांचे भवितव्य धोक्यात येणार असून, जिल्हा परिषद शिक्षक व शिक्षण विभाग अधिक सतर्क झाल्याचे दिसत आहे. गावातील ग्रामस्थ रांगेत उभे राहून हक्काचे सरकारी रेशन घेतील, पण पोरे मात्र इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मोठी फी भरून सुटाबुटात धाडतील, अशी स्थिती लपवून राहिलेली नाही.



# भक्तिमार्ग

पतीला परमेश्वर मानणारी आपली संस्कृती आहे. आपण तिचा सन्मान करतो आणि या विचाराने साजरा होणाऱ्या प्रत्येक सणाचा आनंद लुटतो. सहचर्याच्या पुरातन कल्पनांमध्ये लहानग्यांना विवाहबंधनात अडकवण्याची पद्धत होती. बालविवाह, लहान मुलीशी प्रौढाचा विवाह, प्रौढ विवाह, विधवा विवाह अशा पायऱ्या पार करत आजची कुटुंबव्यवस्था स्थिरावली आहे. पण बदलाची प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. कुटुंबव्यवस्थेची चौकट ओलांडून लिव्ह इन कडे वळणारा तरुण वर्ग याची ग्वाही देतो. या नव्या आणि बदलत्या व्यवस्थेत एखाद्या माणसाला देवत्वाचा दर्जा देण्यासारखा भाबडेपणा अथवा भोळेपणा दिसत नाही, म्हणूनच या जमान्यात वटपौर्णिमेसारख्या सणाचं महत्त्व काय हा प्रश्न उपस्थित झाल्याशिवाय रहात नाही. या सणामध्ये पती-पत्नीमधील प्रेमाचा दाखला दिला आहे. सावित्री आपल्या जीवाची बाजी लावून पतीचे प्राण हरण करणाऱ्या यमाचा पाठलाग करते. बुद्धिकौशल्याने संवादात त्याच्यावर मात करते आणि पतीचे प्राण परत आणते. म्हटलं तर ही प्रीतीकथा आहे आणि म्हटलं तर अतिरंजित कल्पनाविलास आहे. या घटनेची स्मृती म्हणून वर्षानुवर्षे बायका वडाला फेऱ्या घालत आल्या आहेत. वडाला प्रदक्षिणा घालून दोरा गुंडाळायचा, घरोघरी आंब्याचं वाण द्यायचं, सवाष्णींची ओटी भरायची आणि जन्मोजन्मी हाच पती मिळावा म्हणून देवाला प्रार्थना करायची हा या सणानिमित्त पार पडणारा उपचार. आजवर विवाहित स्त्रिया डोळे झाकून या सणाकडे बघत राहिल्या आणि घरातील वडिलधाऱ्या स्त्रियांनी सांगितलेले सगळे उपचार पार पाडत राहिल्या.

आजची स्त्री मात्र झापडबंद अवस्थेतून बाहेर पडली आहे. पती हा परमेश्वर नसून आपला चांगला मित्र असावा या भावनेने ती विवाहबंधन स्वीकारत आहे. आता ती आपली त्यागमूर्ती ही प्रतिमा त्यागू इच्छित आहे. पती हेच अस्मितेचं केंद्र न राहता स्वत्व गवसलेल्या आजच्या स्त्रीला अनेक अस्मिता केंद्रं भुलवत आहे. एका अर्थी भावना आणि व्यवहार याची सुरेख सांगड घालण्यात आजची स्त्री यशस्वी ठरली आहे. म्हणूनच कदाचित सत्यवान-सावित्रीच्या कथेने ती प्रभावित होणार नाही. वडाला दोरे गुंडाळणार नाही. पण याचा अर्थ तिच्या मनात पतीप्रेम नाही अथवा परंपरांचं पालन करण्यास ती अक्षम आहे असं नाही. बदलत्या परिस्थितीतील तिचे बदललेले विचार, तिने गाठलेली यशशिखरे, तिच्या विस्तारत्या कार्यकक्षा या सर्वांचाच मागोवा घ्यायला हवा. इतकं सगळं करुनही प्रत्येक भारतीय स्त्री आपल्या कुटुंबाशीच जोडलेली असते. पक्षिणी आकाशी विहरत असली तरी तिचं चित्त घरट्यापाशी असतं. याच धर्तीवर प्रत्येक भारतीय स्त्रीचा मर्मबिंदू पती आणि तिचं घर याशिवाय दुसरा नसतो. म्हणूनच श्रद्धा, उपचार, पूजाअर्चा या चौकटीतून बाहेर पडून विचारांची सहमती, प्रतिकूल परिस्थितीमध्ये एकमेकांची साथ, एकमेकांशी जोपासलेलं मैत्र या नव्या पैलूंनी पतीपत्नीमधील नात्याचा विचार करायला हवा. कदाचित वटपौर्णिमेच्या सणाचा देखील हाच सांगावा असेल.

कार्यक्षेत्र सीमित असताना किंबहुना उंबऱ्याच्या आतच विश्व समावलेलं असताना प्रत्येक प्रकारच्या सुरक्षेसाठी पूर्वीची सावित्री पतीवर अवलंबून असायची. मात्र आज परिस्थिती बदलली आहे. आज जवळपास प्रत्येक प्रांतात त्यांनी भरारी घेतली आहे. गेल्या काही वर्षांमध्ये अंतराळविज्ञान, अर्थविश्व, परराष्ट्र धोरण, संरक्षण, वन्यप्राणी संशोधन आदी क्षेत्रांमध्ये महिलांनी जोरदार मुसंडी मारल्याचं दिसत आहे. पुरुषांच्या बरोबरीने त्या कामगिरी बजावत आहेत. कुस्तीपासून बॉक्सिंगपर्यंत कोणताही क्रीडा प्रकार तिला वर्ज्य नाही. तिची यशोगाथा कुंठित नाही तर प्रवाही आहे.

**आपल्या संस्कृतीत साजऱ्या होणाऱ्या बहुसंख्य सणांमध्ये स्त्रीने व्रतवैकल्यं करणं आणि पुरुषांच्या प्रगती आणि उन्नतीसाठी प्रार्थना करणं अपेक्षित आहे. वटपौर्णिमा हा सणही त्याला अपवाद नाही. आजही अनेक सावित्री पतीच्या दीर्घायुष्यासाठी वडाला प्रदक्षिणा घालतात. पण कोणा सावित्रीने हे उपचार नाकारले तर तिच्या पतीप्रेमावर शंका घेण्याची मानसिकता त्यागायला हवी. आता सत्यवानांनी अधिक**

भक्ती विशेष

अलिकडेच स्त्रियांना सामावून घेण्यासाठी एक नवं अवकाश सिद्ध झालं आहे. आत्तापर्यंत लष्करामध्ये स्त्रियांचा सहभाग असला तरी तो सीमित होता. लष्करामध्ये स्त्रिया वैद्यकीय, कायदा, इंजिनिअरिंग आदी क्षेत्रांमध्येच सहभागी होऊ शकायच्या. मात्र आता त्यांच्यासाठी प्रत्यक्ष रणभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी उपलब्ध झाली आहे. भारताच्या लष्कर प्रमुखांनी या स्वरुपाची घोषणा केल्यानंतर अनेक युवतींच्या मनात वीरश्री जागी झाली असेल. महिलांनी लष्करामध्ये पाऊल ठेऊन बरीच वर्षे उलटली. नेव्ही कमांडर पुनीत अरोरा, १९६८ च्या वायूदलातील पहिल्या महिला अधिकारी पद्मावती बंडोपाध्याय, काबूलमध्ये भारतीय दूतावासानजीक झालेल्या हल्ल्यावेळी दोन किलोमीटर धावत जाऊन १९ अधिकाऱ्यांची सुटका करणाऱ्या लेफ्टनंट मधुमिता, लष्कर प्रमुखांना पत्र लिहून महिलांच्या लष्कर प्रवेशाविषयी आग्रह धरणाऱ्या आणि आपल्यासह २४ कॅडेटला लष्कराची कवाडं उघडून देणाऱ्या प्रिया झिंगाल अशी अनेक नावं उदाहरणादाखल देता येतील. प्रिया सेमवाल हे असंच एक नाव आहे. युद्धभूमीवर पती शहीद झालेला, पदरात चार वर्षांचं मूल... मात्र या रणरागिणीने पती निधनाचं दु:ख बाजूला ठेवलं आणि देशाची सेवा करण्यासाठी ती लष्करात दाखल झाली. स्वाती सिंग या नथूला पासवर तैनात तुकडीतील एकमेव महिला होत्या. त्यांनी अत्यंत प्रभावीपणे कम्युनिकेशची जबाबदारी सांभाळली. गूंजन सक्सेना या लष्करातील महिलेने कारगिल युद्धादरम्यान हेलिकॉप्टरद्वारे जवानांपर्यंत

## सत्यवानांना समज यावी



रसद पोहचवण्याचं काम अत्यंत धाडसाने पार पाडलं. आजमितीस वायूदलामध्ये ८.३० टक्के महिला आहेत. नौदलामध्ये ४१३ महिला अधिकारी पदावर आहेत. मध्यंतरी फायटर प्लेनच्या पायलट म्हणूनही महिलांसाठी संधी उपलब्ध झाल्या. आता प्रत्यक्ष युद्धभूमीवर शौर्य गाजवण्याची संधी मिळणार असल्यामुळे महिलांसाठी एक नवं पर्व सुरु होणार आहे.


एकंदरच आता स्त्रीचं विश्व घराच्या चार भिंतींपर्यंत मर्यादित राहिलेलं नाही. असं असताना तिने घरातल्या एखाद्या जबाबदारीकडे दुर्लक्ष केलं अथवा स्वत: न पार पाडता मदतनीसांकडून ते काम करुन घेतलं तर दोष देता कामा नये. पुरुषांनी हा बदल स्वीकारायलाच हवा. तिने इतकी वर्षे मनोभावे पतीसेवा आणि कुटुंबसेवा केली. अखेरच्या क्षणापर्यंत केवळ कुटुंबाचाच विचार केला. आता तिला स्वत:चं अवकाश गवसेलेलं असताना पुरुषांनी पुढाकार घेण्याची आणि तिला आवश्यक ती मोकळीक देण्याची गरज आहे. अगदी कौटुंबिक पातळीपासून वैश्विक पातळीपर्यंत पुरुषी मनोवृत्तीत हा बदल घडायला हवा. हाच खरा सावित्रीचा सन्मान असेल. कारण आजही स्त्री वरिष्ठांकडे पाहण्याची पुरुषांची मनोवृत्ती पूर्वग्रहदूषित आहे. घरात आपलं वर्चस्व असावं या भावनेने पछाडलेला पुरुष कार्यालयात एखाद्या कर्तबगार स्त्रीला आपल्यापुढे जाताना पाहू शकत नाही. इतकंच नव्हे तर सर्वच क्षमतांच्या बाबतीत उणा असणारा पुरुष एखाद्या स्त्री वरिष्ठाने दिलेल्या आज्ञांचं पालन करताना आतून डिवचला जातो. माहिती-तंत्रज्ञान क्षेत्रातील स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराच्या काही घटनांद्वारे ही पुरुषी मनोवृत्ती प्रकर्षाने पुढे आली आहे. घरामध्ये पुरुषांना स्त्रीचं उत्पन्न हवं आहे मात्र अधिकार देण्याची वेळ आली की ते मागे हटतात. पुरुषांनी ही दांभिकता आता सोडायला हवी. पती पत्नी ही कुटुंबाची दोन चाकं असतात त्याप्रमाणे पुरुष आणि महिला ही समाजाची दोन चाकं असतात. आता ही दोन चाकं समान पातळीवर, समान वेगाने, समान क्षमतेने धावण्यास सज्ज आहेत. त्याचा लाभ घ्यायला हवा. वैयक्तिक हेवेदावे, फुकाचा अहंगंड, वर्चस्वाच्या कल्पित भावना या सर्वांपलिकडे जाऊन एक माणूस म्हणून स्त्रीचा स्वीकार करणं आणि तिला तिच्या कार्यक्षेत्रामध्ये मनाजोगतं काम करु देणं हे प्रत्येक पुरुषाचं कर्तव्य आहे. आत्तापर्यंत अनेक सावित्रींनी स्वत:ला सिद्ध केलं आहे. तेव्हा आता सत्यवानांची वेळ आहे...

## अंगी सहनशीलता हवी

आयुष्यात यशस्वी होण्यासाठी अंगी सहिष्णूता बाणायला हवी. सहिष्णूतेचं महत्त्व आपण कथेतून जाणून घेऊ या... महात्मा सरयूदास यांचा जन्म गुजरातमधल्या पारडी गावात झाला होता. भोगीलाल हे त्यांचं पाळण्यातलं नाव होतं.

बोध

लहानपणी त्यांना शेजारी राहणाऱ्या बजा भगत यांची साथ मिळाली. सरयूदास मामाच्या घरी राहून त्यांचा व्यवसाय सांभाळत असत. काही काळानंतर सरयूदास यांचा विवाह झाला पण त्यांची पत्नी फार काळ जिवंत राहू शकली नाही. एके दिवशी सरयूदास रेल्वेने प्रवास करत होते. गाडीत प्रचंड गर्दी होती. मुंगी शिरायलाही जागा नव्हती. त्याच वेळी त्यांच्या शेजारी उंच आणि मजबूत बांध्याचा माणूस येऊन बसला. तो सरयूदासांना वारंवार पाय मारत होता. सरयूदास त्याला म्हणाले की, तुझा पाय दुखतोय का? या वेदनांची तीव्रता समजून घेण्यासाठी तू मला वारंवार पाय मारतो आहेस ना? अजिबात संकोच करू नकोस. मला तुझी सेवा करण्याची संधी दे. असं म्हणत त्यांनी त्या माणसाचा पाय मांडीवर ठेवला आणि कुरवाळू लागले.



सरयूदासांच्या या वर्तनाने त्या माणसाला लाजल्यासारखं झालं. तो सरयूदासांची क्षमा मागू लागला. त्यांना म्हणला, तुम्ही महान आहात. माझी चूक झाली. मला क्षमा करा. तुम्ही महात्मा आहात. मला आत्ता याची जाणीव झाली आहे. माणसाने सहनशीलता अंगी जोपासली पाहिजे. हाच गुण माणसाला प्रगतीपथावर घेऊन जातो. सरयूदासांकडून आपल्याला हाच बोधा घेता येईल.

## कशी करावी पूजा?



प्रत्येक धार्मिक व्यक्तीच्या घरात देवघर असतं. घरात पूजाप्रार्थनाही केली जाते. पण कळत-नकळत होणाऱ्या काही चुकांमुळे आपल्याला इच्छित लाभ मिळत नाहीत. पूजा अर्चनेचं योग्य फळ मिळण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✻ देवघरातल्या मूर्तींचा आकार फार मोठा असू नये. देवघरातलं शिवलिंग हाताच्या अंगठ्यापेक्षा मोठं असू नये. शिवलिंगाचं पूजन करताना अनेक नियमांचं पालन करावं लागतं. त्यामुळे छोटं शिवलिंग योग्य ठरतं. तसंच इतर देवांच्या मूर्तीही छोट्या असायला हव्यात.

✻ पूजा करणाऱ्याचं तोंड पश्चिमेला असेल तर अधिक लाभ मिळतात. यासाठी देवघराचं तोंड पूर्वेकडे असायला हवं. पूजा करणाऱ्या व्यक्तीचं तोंड पूर्वेकडे असलं तरी चांगले लाभ मिळू शकतील.

✻ देवघर असलेल्या ठिकाणी भरपूर प्रकाश असला पाहिजे. दिवसातला काही काळ तरी सूर्यकिरणं या ठिकाणी पोहोचली पाहिजेत. हवाही खेळती असायला हवी. सूर्याच्या ऊर्जेमुळे वातावरणातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जा वाढते.

जाणून घ्या

✻ घरात देवघर असेल तर सकाळ संध्याकाळ पूजा करायला हवी. देवपूजा करताना घंटा वाजवा. घरभर घंटेचा आवाज निनादू द्या. घंटेच्या आवाजामुळे घरातली नकारात्मकता दूर होऊन सकारात्मक ऊर्जेचा वास राहतो.

✻ देवाला ताजी फूलं अर्पण करा. तसंच पूजनासाठी भरलेलं पाणीही ताजं हवं. तुळशीची पानं आणि गंगाजल कधीही शिळं होत नाही. त्यामुळे त्याचा वापर कधीही करता येतो. वास घेतलेलं किंवा खराब फूल देवाला अर्पण करू नये.

✻ देवघराच्या ठिकाणी चामड्याच्या वस्तू, पादत्राणं नेऊ नये तसंच देवघरात पूर्वजांचे तसंच मृत व्यक्तीचे फोटो असू नयेत. घरात दक्षिणेकडच्या भिंतीवर मृत व्यक्तींचे फोटो लावता येतील.


✻ देवघराच्या आसपास शौचालय असू नये.

✻ दररोज रात्री देवघर पडद्याने झाकून टाका. यामुळे देवाच्या विश्रांतीत बाधा येत नाही.

## श्रीखंड महादेव यात्रा

हिंदू धर्मानुसार अनेक धार्मिक यात्रा पुण्यादायी मानण्यात आल्या आहेत. कैलास-मानसरोवर, अमरनाथ, चार धाम, नर्मदा परिक्रमा अशा यात्रा करून पुण्य पदरात पाडून घेण्याचा भाविकांचा उद्देश असतो. हिमाचल प्रदेशमधल्या श्रीखंड महादेवाच्या दर्शनासाठी जाणारी श्रीखंड महादेव यात्राही पुण्यदायी मानली जाते. जून-जुलै महिन्यात या यात्रेचं आयोजन केलं जातं. या यात्रेविषयी...

✻ हिमाचल प्रदेशमधल्या द ग्रेट हिमायलन राष्ट्रीय उद्यानाजवळ श्रीखंड महादेवाचं मंदिर आहे. इथल्या पर्वत शिखरावर साक्षात महादेवाचा वास असल्याचं इथली मंडळी मानतात.



✻ या मंदिरातलं शिवलिंग ७२ फूट उंच आहे. हे स्थान निसर्गरम्य असून हिरवाईने नटलेल्या वळणावळणाच्या रस्त्याने ही यात्रा करायची असते. या काळात इथलं वातावरण खूप आल्हाददायी असतं.


✻ ही यात्रा पूर्ण करण्यासाठी तब्बल १८,५७० फूट अंतर पार करावं लागतं. अमरनाथप्रमाणे ही यात्राही कठिण मानली जाते. पण भोलेबाबाच्या नावाचा जयघोष करत भाविक ही यात्रा पूर्ण करतात.

✻ या काळात ऑक्सिजनची कमरता जाणवते. त्यामुळे श्वसनाचा त्रास किंवा हृदयविकार असलेल्यांनी यात्रेआधी डॉक्टरांचा सल्ला घ्यायला हवा.

तीर्थक्षेत्र

✻ या यात्रेला पौराणिक महत्त्व आहे. पौराणिक कथेनुसार या स्थानी भस्मासूराचा वध झाला. भस्मासूर नावाच्या राक्षसाने शंकराला प्रसन्न करून घेऊन ज्याच्या डोक्यावर आपण हात ठेऊ, तो भस्म होईल असा वर मागून घेतला होता. यामुळे भस्मासूर खूप मातला होता. या भस्मासूराला पार्वतीशी विवाह करण्याची इच्छा झाली. शंकराच्या डोक्यावर हात ठेऊन त्यालाच भस्म करण्याचं कारस्थान भस्मासूराच्या डोक्यात शिजू लागलं. त्याच वेळी विष्णूने मोहिनी रूप घेऊन भस्मासूरासोबत नृत्य केलं आणि त्याला स्वत:च्याच डोक्यावर हात ठेवायला भाग पाडलं. यामुळे भस्मासूर जळून नष्ट झाला. हे स्थान श्रीखंड महादेव मंदिराच्या जवळ असल्याचं बोललं जातं.

## शांत झोप, आरोग्याची गुरूकिल्ली



खाण्यासाठी जन्म आपुला, असं अनेकांना वाटतं. खाण्याचं ताट पुढे आलं की आपला संयम सुटतो. तामसी जेवणावर मस्त ताव मारला जातो. आहार-विहाराच्या सवयींवर माणसाचं आरोग्य अवलंबून असतं पण आहारापेक्षाही झोप जास्त महत्त्वाची असते. अपुऱ्या झोपेमुळे आरोग्यविषयक समस्या निर्माण होतात. त्यामुळे भोजनासोबतच निद्रेचं पावित्र्यही राखलं गेलं पाहिजे. झोपेचं पावित्र्य म्हणजे काय तर रात्रभर शांत झोप घेणं. झोपेला ध्यानाचाच एक भाग मानायला हवं. त्यामुळे झोपण्याआधी ध्यानधारणा, मेडिटेशन करायला हवं. यामुळे शांत झोप येईल. यावेळी परमात्मारूपी शांततेचा अनुभव येईल.

आपल्या दिनक्रमात थकवा आल्यानंतर झोप घेतली जाते. थकवा, अस्वस्थतेनंतर आपण निद्रादेवीच्या अधीन होतो. त्यामुळे दिवसाची सुरूवात फार चांगली होत नाही. दिवसभराच्या अस्वस्थतेमागे अपुरी झोप हे महत्त्वाचं कारण मानलं जातं. त्यामुळे झोपण्याआधी एक प्रयोग करता येईल. झोपण्याच्या खोलीत पलंगावर किंवा इतर कोणत्याही स्थानावर मांडी घालून बसा आणि 'ओम'चं उच्चारण करा. हा उच्चार अशा पद्धतीने व्हायला हवा की संपूर्ण शरीरात ओमचा आवाज गुंजावा. ओमचा आवाज आपल्या शरीरात गुंजतोय, अशी कल्पना करायला हवी. दीर्घ श्वास घेऊन ओम म्हणा. ओमचा आवाज संपूर्ण शरीरात पसरला असल्याची कल्पना करा. जिथे थांबाल तो क्षण शून्याचा. पुढच्या वेळी या शून्यापासूनच सुरूवात करा. त्यानंतर पुन्हा ओम म्हणा. दोन ओममधल्या शून्याचा काळ जेवढा दीर्घ तेवढी गाढ झोप येईल. गाढ झोपेमुळे आहार-विहाराच्या चुकीच्या सवयींच्या दुष्परिणामांपासून बचाव होईल. खाण्या-पिण्याबाबत तडजोड केली तरी हरकत नाही पण झोपेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करू नका.

सेल्फ हेल्प



## आनंदी राहण्यासाठी...

प्रत्येकाला जीवनात आनंद हवा असतो. आनंदाची, समाधानाची व्याख्या व्यक्तीसापेक्ष बदलत असते. आनंद, समाधान प्रत्येकाच्या मानसिकतेवर अवलंबून असतं. सुख आणि आनंद मिळवण्यासाठी पुराणामध्ये काही उपाय सांगण्यात आले आहेत. या उपायांनी आयुष्यात सुख नांदू शकतं.

✻ धार्मिक पुस्तकं, पुराणं आणि मासिकांचं वाचन म्हणजे ब्रह्म यज्ञ. यातून आपण ज्ञान घ्यायला हवं. धार्मिक साहित्याच्या वाचनामुळे आंतरिक शांततेची अनुभूती मिळते. यामुळे आनंदही मिळतो.

✻ पिंडदान, श्राद्धकर्म आणि इतर धार्मिक विधींद्वारे पितरांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे. याला पित्र यज्ञ असं म्हटलं जातं. पूर्वजांच्या नित्य स्मरणाने त्यांचे आशीर्वाद मिळतात. शिवाय आंतरिक शांतताही मिळते.

धर्मशास्त्रातून

✻ विविध देवीदेवतांचं स्मरण म्हणजे देव यज्ञ. यामुळे आपल्याला परमेश्वराचे आशीर्वाद प्राप्त होतात. दैनंदिन आयुष्यात परमेश्वराचं स्मरण करत रहायला हवं.

✻ भूतयज्ञ म्हणजे भूतदया. इतरांना मदत करणं, पशुपक्ष्यांची काळजी घेणं यामुळे तुमची चांगली कर्म वाढतात.

✻ घरी आलेल्या पाहुण्यांची नीट काळजी घ्यायला हवी. पाहुणा कितीही मोठा किंवा लहान असला तरी त्यांच्या सरबराईत कोणतीही कमरता राहता कामा नये. याला अतिथी यज्ञ असं म्हटलं जातं.

✻ निसर्गाच्या सानिध्यात काही काळ चाला. यामुळे तुम्हाला आनंद मिळतो.

✻ जुन्या मित्रमैत्रिणींना भेटा. त्यांच्यासोबत वेळ घालवा. यामुळे आनंद वाढतो.

✻ चांगली कर्म करा. लोकांना मदत करा. यामुळे मन:शांती लाभेल.

## असे असावे घराचे कोपरे

वास्तूशास्त्रानुसार घरातल्या दिशांचं, आणि प्रत्येक कोपऱ्याचं वेगळं महत्त्व असतं. घराच्या प्रत्येक कोपऱ्याची रचना वास्तूशास्त्रानुसार करण्यात आली तर घरात समृद्धी आणि समाधान नांदतं. फक्त एवढंच नाही तर कुटुंबातल्या सदस्यांना मानसिक शांतता लाभते. म्हणूनच घरातल्या प्रत्येक कोपऱ्याची माहिती घेणं गरजेचं आहे. त्याविषयी...

✻ घराचा उत्तर-पश्चिम कोपरा समृद्धी आणि सकारात्मकतेचं प्रतिक असतो. घराचा हा कोपरा कधीही अंधारात असू नये. हा कोपरा अंधारात असेल तर घरात नकारात्मक शक्तींचा प्रभाव वाढतो.

✻ घराच्या दक्षिण दिशेचा अधिपती म्हणजे साक्षात यमराज. घराच्या या कोपऱ्यात दार किंवा तिजोरी, कपाट असू नये. या कोपऱ्यात दार किंवा कपाट असेल तर घरातल्या सदस्यांमध्ये कटूता निर्माण होऊ शकते. तसंच अपमृत्यूचं भय असतं.

✻ ज्येष्ठ कुटुंबप्रमुखाची खोली घराच्या दक्षिण-पूर्व दिशेला असू नये. या दिशेला खोली असेल तर घरात नकारात्मकता नांदते. विभक्त कुटुंबातल्या कुटुंबप्रमुखाची खोलीही या दिशेला असू नये.

✻ घराच्या उत्तर-पूर्व कोपऱ्यात स्वयंपाकघर असू नये. यामुळे घराचं आर्थिक नियोजन कोलमडून आर्थिक अडचणी निर्माण होऊ शकतात.



✻ आंघोळीनंतर बाथरूम घाण ठेऊ नये. साचलेलं पाणी काढून टाकावं. सुगंध फवारावा. ओले कपडे वाळत घालावे.

✻ पाणी वाया घालवणं हा खूप मोठा वास्तूदोष मानला जातो. गरजेइतकं पाणी वापरा. घरातले गळके नळ दुरूस्त करून घ्या.

✻ सूर्योदयापूर्वी उठायला हवं. सूर्याची किरणं अंगावर घ्यायला हवी. सूर्योदय म्हणजे नवी सुरूवात. त्यामुळे दिवसाची सुरूवातही आनंदाने करायला हवी.

✻ सूर्यास्ताच्या वेळी झोपू नये. या वेळी दोन प्रहर एकत्र येत असतात. सूर्यास्तानंतर संपूर्ण अंधार झाल्यावरच झोपावं.

वास्तू भक्ती

✻ घराचं स्वयंपाकघर स्वच्छ असायला हवं. स्वयंपाक झाल्यानंतर ओटा नीट धुवून ठेवा. कचऱ्याचा डबाही स्वच्छ करा.

✻ घराच्या उत्तर दिशेची भिंती निळ्या रंगाने रंगवून घ्या. या ठिकाणी निळ्या रंगाच्या काही वस्तू ठेवता येतील. या ठिकाणी लाल किंवा इतर कोणते गडद रंगा लावू नका. यामुळे घरात नकारत्मकता निर्माण होवू शकते.

✻ घराचं प्रवेशद्वार नीटनेटकं आणि स्वच्छ असायला हवं. घराचं प्रवेशद्वार उत्तर, पश्चिम किंवा दक्षिण दिशेला असावं. दक्षिण-पश्चिमेला असलेल्या प्रवेशद्वारामुळे घरात नकारात्मक प्रभाव निर्माण होतो.

✻ स्वयंपाकघराला लाल, केशरी किंवा गुलाबी रंग द्यावा.

✻ घराच्या पश्चिम कोपऱ्याला पांढरा किंवा पिवळा रंग द्यावा. या कोपऱ्यात पैसा ठेवता येईल. घराच्या दक्षिण-पश्चिम कोपऱ्यात अभ्यासिका किंवा वाचनालय असावं.